१८५५
म. ग्रं. सं. ठाणें.
विषय भू-प्रवास
सं. क्र. ५/७०
REFBK-0015822
REFBK-0015822

# नागभूमि

१२८६
म. ग्रं. सं. ठाणें
प्रवास
४४०

लेखक
त्र्यं. र. देवगिरीकर

किंमत १ रुपया

चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणें २.

# नागभूमि

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 54233 दि:
अंक 170
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 9462
REFBK-0015822

लेखक

त्र्यं. र. देवगिरीकर

किंमत १ रुपया

चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणें २.

आवृत्ति पहिली

फेब्रुवारी १९६६

★

मुद्रक व प्रकाशक

दा. त्र्यं. जोशी

चित्रशाळा प्रेस,

५६२ सदाशिव पेठ, पुणें २.

# प्रास्ताविक

नागभूमीचा प्रश्न दिवसेंदिवस चिघळत चालला आहे. तो प्रश्न एकट्या नागभूमीचा नाहीं. त्या भूमीच्या लगत तसे दहा अकरा विभाग आहेत. भारत स्वतंत्र झाल्याला १८ वर्षें लोटलीं; पण त्या विभागांना अद्याप संघटित स्वरूप आलें नाहीं व तेथें स्वास्थ्य शांति नाहीं. याचा अर्थ असा नाहीं कीं, तेथें भारताची घटना किंवा राजवट नाहीं. पण ते विभाग सरहद्दीपलीकडील राष्ट्रांपासून जितके संरक्षणक्षम असावयास पाहिजेत तितके संरक्षणक्षम नाहींत. जवाहरलाल नेहरू यांनीं त्या प्रदेशाच्याकरतां एक घटना करावी असें म्हटलें होतें व श्री. ह. वि. पाटसकर यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिशनहि नेमण्यांत आलें आहे. पण घटना झाली, तरी ती मानली गेली पाहिजे व तिचा अंमल झाला पाहिजे. कांहीं भूमिगत नागा नेत्यांनीं फेब्रुवारी १९६६ मध्यें पंतप्रधान इंदिरा गांधी यांची भेट घेतली. त्यांनीं वृत्तपत्रांना दिलेल्या मुलाखतींत आमची भूमि स्वतंत्र व सार्वभौम आहे या गोष्टीला मान्यता द्या असें तें म्हणत आहेत. हे बंडखोर नागा स्वयंप्रज्ञ तर आहेतच; पण त्यांना फिजो, मिशनरी व अनेक ब्रिटिशांचा पाठिंबा आहे. ही परिस्थिति अत्यंत भयावह आहे. जर नागा बंडखोरांना भारतीय सत्ता मानणाऱ्या इतर नागांप्रमाणें आपल्या घातुक हालचाली, कारस्थानें व घातपाती प्रकार बंद करावयास लावलें नाहीं, तर भारतावरील धोक्यांत आणखी भर पडणार आहे. प्रश्न गंभीर आहे व तो शक्य तितक्या समंजसपणानें व त्वरेनें मिटवला पाहिजे असें वाटतें.


ह्या लहान पुस्तकांत नागभूमीसंबंधीं सर्व आवश्यक माहिती आहे. ती वाचकांना उपयुक्त वाटेल अशी आशा आहे.

पुणें,
१ मार्च १९६६

त्र्यं. र. देवगिरीकर.

# विषयानुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | परिचय | १ |
| २. | नागांचा ईतिहास | ९ |
| ३. | हिंदुस्थानांतील आदिवासी | २० |



राष्ट्रपतींच्या हस्तें नागालँडचें उद्घाटन ता. १-१२-६३ रोजीं झालें. उजवीकडे नागालँडचे पहिले प्रमुख मंत्री **श्री. पी. शिलू**, शपथ घेत आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नों दि: ........
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

# १ परिचय

आज कित्येक वर्षें नागालँड वृत्तपत्रांतून गाजत आहे. हा नागांचा मुलूख आहे कोठें, तेथें कोणते लोक राहतात, त्यांचें जीवन कसें आहे, त्यांचा धर्म, चालीरीती वगैरे समजून घेणें स्वतंत्र भारताला आवश्यक आहे. पण नागाविषयींची माहिती फार अपुरी आहे. मि. व्हेरियर एल्विन हे त्या भागाशीं व सर्वच आदिवासी भारतीयांशीं परिचित होते. मि. एल्विन यांनीं त्या लोकांची सेवा मानवतेनें केली. त्यांनीं एक 'नागालँड' वर पुस्तक लिहिलें आहे व त्याचाच उपयोग सर्वांना होत असतो.

हा नागांचा प्रदेश आसामच्या पूर्वेला आहे. नागभूमीच्या पूर्वेला ब्रह्मदेश आहे. आसाम व ब्रह्मदेशमध्यें ही नागांची भूमि वसलेली आहे. नागाभूमीच्या दक्षिणेला मणिपूर हें राज्य आहे व उत्तरेलाहि आसामचें राज्य आहे. वायव्येला आसाम, पूर्वेला ब्रह्मदेश व दक्षिणेला मणिपूर अशी नागालँडची चतुःसीमा आहे. तो सारा प्रदेश डोंगराळ आहे. पिढ्यान् पिढ्या हे नागा लोक तेथील टेकड्यांत, डोंगरांत व पर्वतांत वास्तव्य करून राहिले आहेत. जगांतल्या सुधारणांचा, राज्यांच्या उलथापालथीचा वारा त्यांना लागला नाहीं. नागा लोक हे परवां परवांपर्यंत आपल्याच विश्वांत पहुडले होते. बहुसंख्य प्रजा जुन्या जमान्यांत जगत आहे.

लोक झाले आहेत. अंगामी- ३०, ०००; आवो-५०, ०००; चाकेसांग-३१,०००; सेमाज-४८,०००; कोनयाक्स- ६३, ०००; संगटाम्स-२०,०००. अशा सत्रा अठरा जमाती मिळून नागा लोक बनले आहेत. त्यांची एकूण लोकसंख्या साडेतीन ते चार लाख इतकी थोडी आहे. पण ह्या थोड्या लोकांनीं ४८ कोटी लोकसंख्येच्या हिंदी सरकारला नकोनकोसें केलें आहे.

वर ज्या मुख्य मुख्य जमातींची लोकसंख्या दिली आहे, त्या जमातींतहि पुनः पोटजमाती आहेत. नागांची एकूण वस्ती थोडी; त्यांत अनेक जमाती आणि पुनः त्यांत पोटजमाती असें हें एकंदर जमात प्रकरण आहे. जर कोणी नागांचीं वैशिष्ट्यें सांगू लागला तर तीं एकाच प्रकारचीं सांगतां येणार नाहींत. साऱ्या नागांची शरीरयष्टि, उंची, एकसारखी नाहीं. त्यांचें रंगरूपहि एकसारखें नाहीं. शेती पद्धत व राहणींतहि समानता नाहीं. कोणी प्रेतें पुरतात, कोणी जाळतात, कोणी उघड्यावर टाकतात, तर कोणी शवच्छेदनहि करतात. नागा लोकांत परस्परभिन्न अशी शासनपद्धति आहे. एका टोकाला जबरदस्त हुकूमशाही व दुसऱ्या टोकाला लोकशाहीचा अतिरेक. गांवोगांव ही भिन्न भिन्न प्रकारची राज्यपद्धति अस्तित्वांत आहे. त्यांत बदल करण्याचे व समानता आणण्याचे भारत प्रयत्न करीत आहे. नागांचीं खेडीं अशींच वैचित्र्यपूर्ण आहेत. अंगामी जमात ही बरीच पुढारलेली आहे. त्यांच्या मुलखांत सुंदर झरे, सुपीक जमीन, उत्तम खतें, पाण्याचा चांगला निचरा, टेकड्यांवर भाताची उत्तम शेती, चारहि दिशांना बांधलेलीं घरें अशी व्यवस्था आहे. नागांचीं सर्वच खेडीं पूर्व आंखणी करून वसवलेलीं आहेत. सपाटीवर हीं खेडीं नाहींत. डोंगराच्या घळींमध्यें, डोंगराच्या उंचवट्यावर तीं वसलेलीं आहेत

नागांचीं घरें कशीं आहेत ? त्यांचीं घरें मोठमोठीं असतात. झोपडीवजा तीं घरें असतात. प्रत्येक घराच्या तोंडाला माणसाच्या कवटीचा सांगाडा असतो व शिंगें असतात. घरांतील पराक्रमी पुरुषानें एखादें संस्मरणीय कृत्य केलेलें असतें, त्यांचें द्योतक म्हणून तें आपल्या घराच्या तोंडाशीं प्रामुख्यानें मांडतात. नागांचें मुख्य अन्न भात हें असतें. त्या भाताबरोबर ते अनेक प्रकारचे मांस खातात. गोमांस किंवा डुकराचें मांस त्यांना वर्ज्य नाहीं. अलीकडे त्यांच्यांत चहा व दूध आलें आहे. ते तांदुळाची बीर पितात. बीरपासून

त्यांना थोडासा कैफ येतो व उत्तेजन मिळतें असें ते म्हणतात. कपड्यांच्या बाबतींत नागा लोक हे फार दक्ष असतात. अत्यंत तलम, कलाकृतीपूर्ण अशीं वस्त्रें ते परिधान करतात. तीं अधिक मोहक दिसावींत म्हणून हस्तिदंत, कवड्या, जनावरांचे केस, पक्ष्यांचीं पिसें वगैरेंचाहि ते शोभेकरितां उपयोग करतात.

त्यांची लोहकला वैशिष्ट्यपूर्ण आहे. ते लोखंडाचीं शस्त्रें करतात व इतर पदार्थ करतात. ते बांबूवर कोरीव कामें करून त्यांत एक सौष्ठव व कला निर्माण करतात. नागांना कुटुंबाचें प्रेम विशेष आहे. कुटुंब, जात, ग्रामीण समाज यांवर तो आसक्त असतो. गृह, कुटुंब, परिवार व खेडें यांत असलेल्या संस्कृतींत कोणी हस्तक्षेप केला तर त्याला तो आवडत नाहीं. जमिनीवर त्याचें प्राणा-इतकेंच प्रेम असतें. वर्षानुवर्षें तो आपली जमीन तशीच कसत आहे. त्याची ती शेतसाऱ्याची पद्धत, शेतीच्या पिकाची धाटणी हीं काल लोटला तरी बदलत नाहीं. त्याच्या ग्रामीण संस्कृतींत पारंपरिक न्यायनिवाडा पद्धत तशीच अबाधित आहे. खेड्याखेड्यांतून न्याय देणारी मंडळें आजहि अस्तित्वांत आहेत.

नागांच्या धर्मविषयक कल्पना ह्या जवळजवळ भारतांतील सर्व आदि-वासींच्या सारख्याच आहेत. या विश्वाचा उत्पादक कोणीतरी श्रेष्ठ देव आहे. तो देव मनुष्यमात्राच्या जीवनाचा नियंता, शास्ता आहे. त्या देवाच्या हाताखालीं अनेक देवता आहेत, भुतेंखेतें आहेत. वृक्ष, नदी, टेकड्या वगैरें-वर वास करणाऱ्या देवताहि तो मानतो. साऱ्या सृष्टींत अपार शक्ति असलेलें एक अदृश्य चैतन्य आहे यावर त्याचा विश्वास आहे. भुताखेतांना वश करण्याची शक्ति पुरोहित व वैद्यवर्गांत आहे. ते तीं भुतें पळवून लावतात; जे रोग निर्माण करतात, त्या भुतांना ते हद्दपार करतात. ज्या उपकारक देवता आहेत त्यांना ते आपल्याकडे वळवतात. ह्या पुरोहितांच्या मंत्रामुळें शेती चांगली पिकते, प्रजा चांगली निर्माण होते व जो कामधंदा करतो, त्याला मदत होते, वगैरे त्यांच्या कल्पना आहेत.

मरणोत्तर काय होतें याबद्दल साऱ्या नागांचें एकमत नाहीं. पण आत्मा अमर आहे हें मात्र सर्वजण मान्य करतात. त्याला कोणती गति प्राप्त होते याबद्दल मतभेद आहेत.

पूर्वीं फार मोठ्या प्रमाणावर नागा लोक एक मोठा समारंभ करीत. तो

समारंभ यज्ञासारखा असे. उत्तमोत्तम जेवणें, उत्तमोत्तम कपडे, वगैरे त्या समारंभाचें वैशिष्ट्य असे. पत्नीशिवाय हा समारंभ साजरा होऊं शकत नसे. तो समारंभ बरेच दिवस चाले. जीवनांत ऐश्वर्य व मरणोत्तर उत्तम गति प्राप्त व्हावी याकरितां हा समारंभ असे. हाजला जाऊन आलेला मुसलमान किंवा चार धामाची यात्रा करणारा हिंदु हा जसा समाजांत प्रतिष्ठा पावतो, त्याप्रमाणें हा समारंभ करणारा नागा प्रतिष्ठा पावे. त्याचे कपडे, त्याचें घरदार वगैरे सर्व विशेष प्रतिष्ठेचें असे. त्या समारंभांत पशूंचें बलिदान होई. तें सर्व वैदिकसदृश विधीनें होई. पण अलीकडे दहावीस वर्षें ह्या समारंभाला उतरती कळा लागली आहे.

मुंडकीं कापणें ही एक साऱ्याच रानटी लोकांप्रमाणें नागा लोकांतहि चाल आहे. पण त्याचें एक तत्त्वज्ञान त्यांनीं बनविलें आहे. त्यांच्या समजुतीप्रमाणें माणसाचा आत्मा किंवा चैतन्यशक्ति ही डोक्यांत असते. दुसऱ्या गांवांतील माणसाचें डोकें कापून तें आपल्या गांवांत आणलें म्हणजे आपल्या गांवांतील चैतन्य किंवा आत्मशक्तीहि वाढते असें ते समजतात. तें डोकें आणलें म्हणजे गांव सुखी होतें, जनावरें अधिक काम करतात व शेती अधिक उत्पन्न देते. विशेषतः लांब केसांच्या बायकांचें डोकें हें शेतींतून अधिक उत्पन्न देतें असें ते मानतात. नागांचा हा सिद्धांत भ्रामक आहे; पण तो खरा मानला तरी सारीं डोकीं सारखींच किंवा चांगलीं नसतात. वाईट माणसांच्या डोक्यांपासून गांवाचा नाश होण्याचीहि शक्यता असते. नागा हे योद्धे व लढाऊ जमातीचे लोक आहेत. एखाद्या तरुणानें जर दुसऱ्या गांवांत जाऊन कोणाचें शिर कापून आणलें, तर तो महान् पराक्रमी मानला जातो व त्याला अत्यंत सौंदर्यसंपन्न अशा वधूचा लाभ होतो. ज्यानें हा पराक्रम केला नसेल, त्याचें लग्न होणेंहि कठीण असतें. तेव्हां विवाहित व्हावयाचें असेल तर डोकें कापून आणलें पाहिजे असा नागांचा आदेश असतो.

पण हीं मुंडकीं कापण्याची पद्धत ब्रिटिशांचा नागा प्रदेशांत अंमल सुरू झाल्यानंतर संपली. आपल्याकडे सतीची चाल ही ज्याप्रमाणें ब्रिटिश राजवटींत खलास झाली, तसेंच तेथें घडलें.


नागांच्या भाषा ह्या अनेकविध आहेत. त्या लोकभाषा आहेत व मैलामैलांवर व खेड्याखेड्यांत बदलतात. एकाच घरांत भिन्नभिन्न लोकभाषा

प्रचलित आहेत. नागांच्या भाषा ह्या तिबेटी–ब्रह्मी वांशिक भाषेंतून उद्भूत झाल्या आहेत. त्यांचें संशोधन पौर्वात्य व पाश्चात्य पंडितांनीं केलें आहे. पण नागांचीं त्यांच्या भाषेंतील पुस्तकें उपलब्ध नाहींत. शिक्षणच तेथें नव्हतें, मग कसलें साहित्य, कसलें लेखन व कसले ग्रंथ! हिंदुस्थानांतहि अशाच भिन्न भिन्न भाषा आहेत. एक दुसऱ्याशीं इंग्रजींत किंवा हिंदींत बोलतो. बाजारांत ह्या दोन्ही भाषा आजहि मोडक्यातोडक्याच बोलल्या जातात. नागांत तसेंच आहे. मोडक्या आसामींत किंवा मोडक्या इंग्रजींत ते परस्परांशीं बोलतात. एकदां नागांची एक परिषद भरली होती. त्या परिषदेंत ते आपल्याला आसामपासून वेगळे करावें असें जोरजोरानें प्रतिपादन करीत होते व तें प्रतिपादन आसामी भाषेंत चाललें होतें. पण आम्ही हिंदुस्थानांतील लोक ब्रिटिश राज्य नको हें इंग्रजींतच सांगत नव्हतों काय? आणि आजहि भाषावार किंवा प्रदेशवार राज्यांची मागणी आम्ही इंग्रजींतच करीत नसतों का? आसामी भाषा ही नागभूमींत भिन्नभिन्न जमातींत व्यवहार करण्याचें एक माध्यम आहे. अलीकडे अलीकडे कांहीं नागा हिंदी व इंग्रजींत बोलूं लागले आहेत.

नागा लोक हे रुक्ष नाहींत. ते मोठे रसिक आहेत. नागा भाषेंतील वाङ्मय प्रसिद्ध झालें नसलें तरी त्यांच्यांत तें तोंडीं प्रचलित आहे. जर वेद मुखोद्गत करणारे भारतीय होते तर प्रेमाचीं गाणीं, पराक्रमाचीं वर्णनें वगैरे तोंडपाठ असणारे तरुणतरुणी, शाहीर, भाट वगैरे तेथें कां नसावेत! प्रेमाच्या भावना व्यक्त करण्याची शक्ति नागांच्या काव्यांत अमाप आहे. तीं प्रेमकाव्यें त्यांच्या संगीतांतून गायलीं जातात. दळणकांडण करणाऱ्या तरुणी तीं काव्यें आळवीत असतात व मोठ्या एकात्मतेनें गात असतात.

पण त्यांच्या गाण्यांत राम, कृष्ण किंवा साधुसंतांनीं प्रवेश केलेला दिसत नाहीं. भारतीय देवादिकांबद्दल त्यांना आपलेपणा नसेल तर तो समजूं शकतो. पण ज्याला भक्तिपर वाङ्मय म्हणतात, तें त्यांच्यांत जन्म पावलेलें नाहीं. अर्थात् आम्हांला त्याची माहिती नाहीं. तसें वाङ्मय असेलहि, पण तें फार थोडें व अज्ञात असेल. धर्माचा पगडा एकदां मनावर बसला म्हणजे सारें जीवन बदलतें. तसा प्रकार नागांत झाला असावा असें वाटत नाहीं. ते कालपर्यंत आपल्याच संस्कृतींत वावरत होते. आम्ही भारतीयांनीं त्यांची उपेक्षा केली. त्यांच्या प्रदेशांत आम्ही गेलों नाहीं, त्यांचीं सुखदुःखें, त्यांचे आचारविचार, त्यांची

संस्कृति समजून घेण्याचा व त्यांत बदल करण्याचा प्रयत्न नागा आमचा देश आहे असें म्हणणाऱ्या आम्ही भारतीयांनीं केला नाहीं. तेव्हां त्यांच्या मागासलेपणाला ते जबाबदार नसून आम्ही जबाबदार आहोंत असें म्हटलें तर फारसें चूक ठरणार नाहीं.




नागालँड स्वाभाविक नकाशा




नागालँड व त्याच्या भोंवतालचा प्रदेश

# २—नागांचा इतिहास.

नाग लोकांच्या इतिहासाचें संशोधन करणें अवघडच आहे. किरातापर्यंत मागें गेलें तरी निश्चितपणें अमुक लोकांना नागलोक म्हणत हें सांगणें कठीण आहे. नदीचें मूळ जसें सांपडत नाहीं, तसें जातीजमातीचेंहि मूळ सांपडत नाहीं. त्याचें कारण काल जसजसा लोटतो, तसतसें मूळच्या लोकांचे, इतरांशीं लग्नव्यवहार होतात व एक मिश्र संतति निर्माण होते. जर ती संतति पराक्रमी, बुद्धिमान्, चारित्र्यसंपन्न निपजली, तर इतरांनाहि त्या जमातींत आपला समावेश व्हावा असें वाटूं लागतें.

तेराव्या शतकापासूनचा त्यांचा इतिहास एल्विननीं दिला आहे. तो आपण प्रमाण मानूं या. त्या शतकांत ब्रह्मदेशच्या एका शान प्रमुखानें हिंदुस्थानवर आक्रमण केलें व नागा लोकांना जिंकलें. हिंदुस्थान व ब्रह्मदेश यांच्या दरम्यान पटकोई डोंगरांची रांग आहे व तीच ह्या दोन देशांना विभागणारी रेषा आहे. त्या वेळीं आजच्यासारखी जागृत परिस्थिति नव्हती. हिंदुस्थानवर हें आक्रमण झालें असें कोणालाहि वाटलें नसेल. अर्थात् शान प्रमुखाला जोरदार प्रतिकारहि कोणी केला नाहीं. नागा व इतर जमातींनीं त्यांच्याशीं लढत दिली; पण तेच पराभूत झाले.

१३ व्या शतकाचा तो काळ; आणि रानटी लोकांचा तो डोंगराळ मुलूख.

त्या शान मुख्यानें जगांतील साऱ्या क्रूर हुकूमशहांवर मात केली. त्यानें नागा कैद्यांना ठार केलें, त्यांचीं प्रेतें भाजलीं आणि त्यांच्या नातलगांना तें मांस खाण्यास भाग पाडलें. माणुसकी, दयामाया राहोच, पण नैसर्गिक भावनांचाहि त्यांनीं चक्काचूर केला. मानवी इतिहास हा इतका भयानक आहे.

नाग लोक हें ब्रह्मदेशांतील शान राजाचे गुलाम झाले. पण पुढें असें दिसतें कीं, आसामच्या अहोम राजांनीं नंतर त्यांना गुलाम केलें. एकीकडे ब्रह्मदेश व दुसरीकडे आसाम या कात्रींत सांपडलेल्या नागांना कोणाचे ना कोणाचे तरी गुलाम म्हणून जगावें लागे. पण अहोम राजे शान राजाइतके निर्दय व अमानुष नव्हते. नागांचे व त्यांचे संबंध कधीं मित्रत्वाचे तर कधीं वैराचे होते. अहोम राजे नागांना आपले प्रजाजन मानीत; त्यांच्यापासून कर वगैरे घेत. ते कर पैशाच्या रूपानें घेतले जात नसत. हस्तीदंत, गुलाम, भाले, कापड वगैरेंच्या स्वरूपांत ते कर वसूल केले जात. अहोम राजांनीं नागांच्या मुख्यांना जमिनी वगैरे दिल्या व ते आपले सरदार आहेत असें मानलें. आसामी राजे आपल्या अधिकाऱ्यांमार्फत तेथें राज्यकारभारहि चालवीत. नागा लोक हे मोठे आदरशील होते. एक अहोम राजा एकदां आश्रयाकरितां नागभूमींत येऊन राहिला होता. त्याला नागांनीं बांचवला. पुढें १६ व्या व १७ व्या शतकांचा इतिहास सांपडतो. त्या शतकांत नागा लोक व अहोम राजे यांच्यांत खटके उडाल्याचें दिसतें. १५३० मध्यें नागांनीं अहोमच्या सैन्याचा पराभव केला. कांहीं तोफा त्यांनीं ताब्यांत घेतल्या. पुढें काय झालें तें नोंदलेलें नाहीं. पण त्या घटनेमुळें नागा व अहोम यांचे संबंध बिघडले.

१६९२ सालपर्यंत म्हणजे सुमारें १५० वर्षें हे संबंध शत्रुत्वाचेच होते. १६९२ सालीं नागांनीं २३ आसामी लोक ठार केले. आसामला हा फार मोठा धक्काच होता. त्यांचीं राज्यें तरी कुठें भक्कम होतीं? पण त्या प्रकरणानंतर अहोम राजा गदाधर सिंग यांनीं नागांवर स्वारी केली, त्यांचा सूड घेतला, एका नाग राजाला ठार केलें आणि बाकीच्यांना आसामच्या राजधानींत बोलावून त्यांच्याकडून राजनिष्ठेच्या शपथा घेववल्या. त्यानंतर लवकरच आणखी एक बंड तेथें झालें. अभोर लोकांनीं निष्कारण नागावर हत्यार उपसलें. त्याची प्रतिक्रिया उठावांत झाली. तें बंड मोडण्यांत आलें आणि नागा लोकांनीं गदाधर सिंगाला आपल्या दोघां राजांच्या दोन मुली, चाकर-नोकर

वगैरेंचा नजराणा पाठविला. त्यानंतर नागांची प्रतिष्ठा वाढली. त्यांना आसामी सैन्यांत दाखल करण्यांत आलें. नागा लोक हे युद्धकलेंत अत्यंत निष्णात आहेत व ते अत्यंत सुसज्ज अशा सैन्यापासून स्वतःचें रक्षण करण्यास समर्थ आहेत असें गौरवानें म्हटलें जाऊं लागलें. नागा लोक आसामी राजांना कर वगैरे देत नसत; पण आसामच्या राजांचें सार्वभौमत्व मानीत असें १६६२ सालीं मिरजुमलाबरोबर आसामच्या स्वारींत गेलेल्या शिआ-बुद्दीननें म्हटलें आहे.

नागा लोक हे जातिभेद मानीत नाहींत. आसामी लोकांना ते आपल्या घरांत बोलावीत व त्यांच्याबरोबर जेवत. या गोष्टीचा आसामी लोकांवर फार परिणाम झाला व ते नागांना आपले नातेवाईक म्हणूं लागले. अशा प्रकारें नागाभूमींत इतिहास घडत होता. मध्यंतरीं मोंगलांची सत्ता भारतांत स्थापन झाली; पण मोंगलांचा अंमल नागभूमीवर प्रत्यक्ष स्थापन झाला नव्हता. आसामच्या सार्वभौमत्वाखालींच नागा लोक होते.

## ब्रिटिश सत्ता :

१८ व्या शतकाच्या अखेरीस ब्रिटिश व ब्रह्मी लोक यांच्यांत कटकटी सुरू झाल्या. त्याचे परिणाम नागा लोकांना भोगावे लागले. १८२४ मध्यें इंग्रज व ब्रह्मदेश यांचें युद्ध संपलें व नागा लोकांचा छळ समाप्त झाला. १८३२ मध्यें ब्रिटिशांना आसामच्या खोऱ्यांत अनेक टोळ्या स्वतंत्रपणें वावरत असणाऱ्या दिसल्या. त्या टोळ्या रानटी होत्या व आसामचे राजे त्यांना कह्यांत ठेवूं शकत नव्हते. त्या टोळ्यांचे मुख्य आपल्या परस्परांच्या हक्कासंबंधीं ब्रिटिशां-कडे तक्रारी नेत. पण ब्रिटिशांनीं सुद्धां त्या टोळ्यांच्या बाबतींत कांहीं भक्कम धोरण स्वीकारलें नाहीं. आसाम ब्रिटिशांनीं व्यापला खरा; पण नागांचें दुर्दैव व हाल त्यामुळें संपले नव्हते. त्यावेळीं सिंगफो ह्या नांवाची एक लढाऊ जमात होती. आसाम स्वतंत्र असतांना त्यांना तेथें गुलाम मिळत. पण ब्रिटिश राजवटींत ही गुलामगिरी बंद झाली. पण आसामला गुलाम लागतच. ते गुलाम या सिंगफो जमातीनें नागा लोकांतून मिळविण्याचें सुरू केलें. ह्या सिंगफोंनीं नागांचीं खेडीं जाळूनपोळून १८३७ मध्यें बेचिराख केलीं; नागांना गुलाम म्हणून फरफटत चालविलें. तो प्रकार ब्रह्मदेशाची लढाई संपवून

आलेल्या ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं पाहिला; पण त्यांनीं नागांना कैदेंतून मुक्त केलें नाहीं. उगीच आणखी कटकटी नकोत म्हणून ते कदाचित् उदासीन राहिले असावेत.

**मणिपूर व नागभूमि :**

नागांना पूर्वेकडून ब्रह्मदेश, पश्चिमेकडून आसाम जसा छळत होता, तसा दक्षिणेकडून मणिपूरचा त्रास त्यांना होई. १८३२–३३ सालची ही घटना आहे. मणिपूरचा राजा गंभीरसिंग म्हणून होता. त्याची महत्त्वाकांक्षा नागा लोकांना कायमचें जिंकून टाकावें अशी होती. तेव्हां त्या राजानें इंफाळहून आसामवर स्वारी केली. वाटेंत नागांचा प्रदेश. त्या प्रदेशांत गंभीर सिंगानें आक्रमण केलें आहे हें ब्रिटिशांना कळलें तरी ते स्वस्थ बसले. ब्रिटिश म्हणूं लागले, मणिपूरला नागा टेकड्यांच्या दक्षिणेकडील भागावर कांहीं अधिकार आहेत. ते अधिकार काय आहेत याची चौकशी न करतां मणिपूरचें नागभूमीवरील आक्रमण ब्रिटिशांनीं मान्य केलें.

१८३५ सालीं नागांनीं उत्तर काचारच्या टेकड्यांवरील खेड्यांवर हल्ले केले. त्या हल्ल्यांमुळें ब्रिटिश सरकार अस्वस्थ झालें व त्यांनीं नागांच्या बंदोबस्ताची जबाबदारी एका स्थानिक मुख्यावर व मणिपूर संस्थानवर सोपविली. पण ही कारवाई आसामच्या कमिशनरला पसंत पडली नाहीं. त्याचें कारण मणिपूर संस्थानच्या सैनिकांना पगार नसे, त्यांनीं जवळपासच्या खेड्यांवर धाडी घालाव्यात व आपला पगार वसूल करावा अशी त्यांची स्थिति होती. मणिपूरवर नागांच्या बंदोबस्ताची जबाबदारी टाकण्यानें त्यांना धाडी घालण्याची सनदच देण्यांत आली. ती गोष्ट कमिशनरसाहेबांना आवडली नाहीं. नागा लोक हेहि मणिपूरच्या फौजेइतकेच धाडी घालण्यांत बेफाम व अविचारी होते. पण ब्रिटिशांनीं तें थांबवलें नाहीं एवढेंच नव्हे, तर मणिपूरच्या मदतीला एका युरोपियन अधिकाऱ्याच्या आधिपत्याखालीं एक तुकडी पाठविली. पुढें हें धोरण चुकीचें आहे असा ईस्ट इंडिया कंपनीच्या नियामक मंडळानें निकाल दिला. तेथें बंदोबस्ताकरितां एक ब्रिटिश सिव्हिलियन पाठविण्यांत आला.

त्यानंतर सुमारें शंभर वर्षेंपर्यंत ब्रिटिश सरकारनें नैर्ऋत्येकडील जमातींचा बंदोबस्त कसा करावा ह्याचा निकालच केला नाहीं. त्याचें कारण उघड होतें. एवढा मोठा देश त्यांच्या पदरांत पडला खरा; पण त्या देशांतील कोना-

कोपऱ्यांत आपली सत्ता स्थापन करण्यास त्यांच्याजवळ नव्हता पैसा व साधनें. म्हणून त्यांनीं त्या विभागाची उपेक्षाच केली. त्याचा फायदा नागा लोकांनीं घेतला. ते सपाटीवरील खेड्यांवर हल्ले करीत, लूटमार करीत.

हे नागा लोक एक शतकपर्यंत शेजारच्या सपाटीवरील प्रदेशांत धुमाकूळ घालीत होते. मुंडकीं कापण्याचा त्यांचा उद्योग सुरू होता. त्यामुळें भयग्रस्तता वाढत होती. ब्रिटिश सरकार त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत होतें. पण १८६७ मध्यें या नागांनीं गेलाटी येथील चौकीवर हल्ला केला, पोलीस ठार केले आणि त्यामुळें सरकारचें लक्ष त्यांच्याकडे वेधलें गेलें. हें हल्ले कां होतात असा प्रश्न निर्माण झाला. कोणी म्हणत कीं, आसाममध्यें टेकड्यांवर चहाचे मळे होऊं लागल्यामुळें साऱ्या सरहद्दीवरील जमाती खवळल्या. कोणी म्हणत, बाजारला जातांना बरोबर भाले–बर्च्या नेऊं नका असा जो निर्बंध घातला आहे, त्यामुळें नागा बिथरले आहेत. पण हीं सारीं कारणें खोटींच होतीं. नागा लोक हे वृत्तीनें बंडखोर आहेत. त्यांचे हल्लेहि जोरदार असत. १८५१ पर्यंतच त्यांनीं २२ हल्ले केले, ५५ माणसें ठार मारलीं, ११३ जणांना गिरफदार केलें. १८५४ ते १८६५ पर्यंत अनगामीजनीं १९ हल्ले केले व २३२ लोक ठार मारले. त्यानंतरच्या दहा वर्षांत तर त्यांनीं ३३४ लोक मारून टाकले. तेव्हां नागालँडमध्यें राज्य कोणाचें असा साहजिकच प्रश्न निर्माण झाला. ब्रिटिश अधिकारी जागे झाले, खवळले व या रानटी लोकांना जोरदारपणें प्रतिकार करा असें म्हणूं लागले. ब्रिटिश पद्धत हीहि मोठी चांगली नव्हती. एखाद्याला शिक्षा करावयाची म्हणजे तो रहात असलेलें सारें खेडें जाळून बेचिराख करावयाचें अशी ती भयंकर पद्धत होती. निरपराधी लोकहि त्यांत बळी जात. त्या नागांचीं घरें बांबूचीं असत व म्हणून पुनः तीं लवकर बांधतां येत; पण त्या स्वाहाकारांत धान्याचीं कोठारें व उभीं पिकेंहि भस्मसात् होत. ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं या नागा लोकांचें सर्पसत्रच सुरू केलें. खेडीं उठलीं, जमिनी ओसाड पडल्या, लोक इतस्ततः भटकूं लागले आणि त्यांचें सारें जीवन उध्वस्त झालें. नागांची ससेहोलपट झाली. पण नागांच्या नाशानें हा प्रश्न सुटणार नव्हता. त्यांच्यावर सत्ता स्थापन करणें व त्यांना रानटी अवस्थेंतून वर काढणें ही मुख्य जबाबदारी ब्रिटिशांवर होती.

१८६६ सालीं बंगालच्या ले. गव्हर्नरनीं एक महत्त्वाचें निवेदन केलें आहे.

तें आजहि तितकेंच महत्त्वाचें आहे. आपल्या निवेदनांत ले. गव्हर्नर म्हणतात : ' अलीकडच्या पत्रव्यवहारांत ह्या अनगामी नागांना वारंवार स्वतंत्र म्हणून संबोधण्यांत येतें; आणि त्यांचा वास्तव्याचा प्रदेश व ब्रिटिश प्रदेश यांत फरक आहे असें दाखवण्यांत येतें. पण असा फरक करण्यास कांहींहि जागा नाहीं. ब्रह्मदेशबरोबर झालेल्या तहांत पटकोई ही टेकड्यांची रांग ब्रह्मदेश व हिंदुस्थान यांची विभागणी करणारी आहे असें म्हटलें आहे. तसेंच मणिपूरच्या तहांत बुरेल ही टेकड्यांची रांग मणिपूर व हिंदुस्थान यांच्या सरहद्दी दाखविणारी आहे असें म्हटलें आहे. त्या दोहोंत व हिंदुस्थानच्या दरम्यान स्वतंत्र प्रदेश नाहीं. या टेकडयांच्या उताराला दक्षिण भागांत ज्या टोळ्या राहातात, त्यांच्यावर ब्रह्मदेश व मणिपूर यांचा ताबा आहे; पण उत्तरेकडील उतारांच्या टोळ्यांवर ब्रिटिशांचा ताबा आहे ह्या टोळ्या व अनगामीसह नागा लोक स्वतंत्र आहेत. ' याचा अर्थ ब्रिटिशांनीं त्यांना पूर्णपणें आपल्या कह्यांत आणलें नाहीं एवढाच होतो. त्यांनीं त्यांना मधून मधून अपवाद सोडल्यास पूर्णपणें मोकळें सोडलें; पण त्यांना राजकीय किंवा प्रादेशिक स्वातंत्र्य कधींच दिलें नाहीं.

" These latter, including thc Angami Nagas, are independent only in the sense that the British Government has refrained from reducing them to practical subjection, and has left them, except at occassional intervals entirely to themsleves; but they have never enjoyed or acquired political or territorial independence, and it is clearly open to the British Government in point of right, as it is incumbent on it in good policy to exercise its Sovereign power by giving them the benefit of a Settled administration. "

नागा लोक हे स्वतंत्र नाहींत त्यांच्यावर सार्वभौम सत्ता गाजविण्याचा अधिकार आपल्याला आहे असें बंगालच्या ले. गव्हर्नरनें स्वच्छपणें १०० वर्षांपूर्वींच म्हणून ठेवलें आहे. तेव्हां नागा लोक व त्यांचा प्रदेश स्वतंत्र आहे असें कोणी आतां म्हणत असेल तर तें ऐतिहासिक दृष्ट्या चूक आहे. नागांचा प्रदेश हा हिंदुस्थानचाच भाग आहे. नागा लोकांच्या डोंगराळ भागांत ब्रिटिश

सत्ता प्रभावीपणें जारी नव्हती, याचा अर्थ नागा लोक स्वतंत्र होते असा नाहीं. आपल्याजवळ त्या भागांत करडा अंमल सुरू करण्यास पैसा नाहीं असेंहि १८६६ सालीं हिंदुस्थान सरकारनें म्हटलेलें होतें.

" But His Excellency in Council cannot admit that we are bound to attempt more in their behalf that the resources of the Empire can reasonably afford. "

नागा लोकांच्या कारभारांत ढवळाढवळ न करण्याचें हें धोरण अपयशी ठरलें. ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टर्सना तें धोरण पसंत नसे. अनगामी लोक आम्हांला मुंडकीं तोडणाऱ्या या राज्यापासून वांचवा अशी विनंति करूं लागले. म्हणून १८६६ मध्यें सामागुटिंग येथें एक ठाणें स्थापण्यांत आलें व तेथें एक शाळा व दवाखाना काढण्यांत आला. रस्तेबांधणी, व्यापार वगैरे सुरू करण्यांत आला. नागा लोक सपाटीवर व्यापारउदीम वगैरेकरितां येऊं लागले. कांहीं वर्षांनीं या नागांबद्दल आसाममध्यें वाटणारी दहशत नाहींशीं झाली. ते लोकहि शांततेनें नांदूं लागले. १८७८ मध्यें कोहिमा येथें त्या भागांत शासन करतां यावें म्हणून एक मुख्य कचेरी उघडण्यांत आली व वोखा येथें दुय्यम कचेरी काढण्यांत आली. नागा प्रदेशांत पोलिसांची एक जोरदार सेना स्थापण्यांत आली. ती सेना आंतील खोलवर भागांतहि दरारा बसवूं लागली. लोकांकडून दर घरामागें २ रु. कर बसवण्यांत आला. १८८१ मध्यें नागाहिल्स हा एक जिल्हा करण्यांत आला. आणखी एक उपकेंद्र त्याच वर्षी मोकोकाचुंग येथें स्थापण्यांत आलें.

शिस्तीच्या व प्रभावी राज्यकारभाराचा नागांवर काय परिणाम होतो हा प्रश्न होता. पण नागांवर त्याची प्रतिक्रिया चांगली झाली. निरनिराळ्या जाती-जमातींनीं नीटपणें वागावें म्हणून करार-मदारहि करण्यांत आले. आणि लोकांच्या विनंतीवरून दिमापूर येथें एक मिठाची वखारहि काढली गेली. बहुतेक साऱ्या नागा लोकांच्या जमाती नव्या राज्यव्यवस्थेचें स्वागत करूं लागल्या; पण त्याला कांहीं अपवाद होते.

१८७९ मध्यें खोनोमा या एका बंडखोर खेड्यानें शत्रुत्व आरंभिलें. तें खेडें एखाद्या किल्ल्याप्रमाणें खोऱ्याच्या वर डोंगरांनीं वेष्टिलेल्या जागीं आहे. त्या खेड्यांत पहिला डेप्युटी कमिशनर मि. डमांट हा भेट देण्यास गेला असतां

त्याचा खून करण्यांत आला आणि त्याच्याबरोबर असलेल्या ३५ जणांना ठार करण्यांत आलें. खोनोमाच्या लढवय्यांनीं उत्तरेस असलेल्या कोहिमाला वेढा घातला. पण ब्रिटिशांनीं मणिपूरकडून हल्ला चढवून तो वेढा आठवड्याच्या आंत उठवला. तेथें पोलिस वगैरेंत वाढ करून कडक बंदोबस्त करण्यांत आला. थोडाफार उपद्रव त्या जमातींतील परस्पर वैरामुळें पुढेंहि होत राहिला. पण एकंदरींत नागा लोक हे पूर्णपणें बंडखोरी वगैरे सोडून सभ्य प्रजाजन बनले. ते शेती व उद्योगधंदे करूं लागले. नागाभूमीचा प्रश्न अशा प्रकारें निकालांत निघाला. ब्रिटिश सरकारनें त्यांच्यांत ख्रिस्ती मिशनरी पाठवून धर्मांतर करविलें व त्यांना शांत केलें कीं काय हें सांगवत नाहीं.

पहिल्या महायुद्धांत म्हणजे १९१४ सालच्या युद्धांत नागा प्रदेशाला कांहीं उपद्रव झाला नाहीं. ब्रिटिशांनीं सुमारें २००० नागा लोक मजूर म्हणून फ्रान्समध्यें पाठविले. प्रत्येक जमातींतून ही मजूर सेना उभारण्यांत आली. युद्धाला मजूर पुरविण्याबरोबर नागा लोकांनीं त्या युद्धाकरितां २६,००० रु. कर्ज म्हणून दिले.

दुसऱ्या महायुद्धांत नागाभूमीवर फारच भयंकर प्रसंग आले. जपानी सैन्य कोहिमाच्या वेशीपर्यंत पोहोंचलें होतें आणि जपानी सैनिकांच्या तुकड्या नागाहिल जिल्ह्यांत व ट्युएनसँगच्या डोंगरी रांगांत पसरल्या होत्या. नागा लोकांनीं जपानला आसरा दिला नाहीं. त्यांनीं दोस्तांना चांगली साथ दिली. फिल्ड मार्शल सर विल्यम स्लिम आपल्या ग्रंथांत लिहितात, ' या शूर नागा लोकांची निष्ठा, अत्यंत कठीण अवस्थेंत देखील विचलित झाली नाहीं. नागांना फटके मारले, त्यांचे हाल हाल केले, त्यांना ठार केलें, त्यांचीं खेडीं जाळलीं तरी त्यांनीं जपान्यांना मदत केली नाहीं व ब्रिटिश सैन्याला दगा दिला नाहीं. त्यांनीं केलेली मदत अत्यंत अमोल व स्तुति करण्यापलीकडे होती. '

सदर सेनाधिकारी म्हणतात कीं, त्या लोकांनीं आमच्या सैन्याला जीवावर उदार होऊन मदत केली आणि सर्वांत महत्त्वाचें म्हणजे त्यांनीं त्याबद्दल पैसे घेतले नाहींत. त्यांच्यामुळेंच अनेक ब्रिटिश व हिंदी शिपायांचे प्राण वांचले. साऱ्या हिंदी व ब्रिटिश सैनिकांनीं त्यांच्याबद्दल धन्योद्गार काढले. ब्रिटिशांच्या राज्याबद्दल त्यांना जसा आपलेपणा वाटत होता, त्याप्रमाणेंच जपानी लोकांबद्दल त्यांना द्वेष वाटत होता. याच कारणांमुळें त्यांची अमोल मदत

ब्रिटिशांना झाली. नागाहिल जिल्ह्यांत जरी ब्रिटिश सत्ता स्थापन झाली, तरी सारा नागा प्रदेश ब्रिटिशांनीं आपल्या सत्तेखालीं आणला नाहीं. उत्तरेला असलेला ट्युएनसँग हा विभाग उपेक्षितच होता. आतां तो एक जिल्हा आहे. त्या जिल्ह्यांत लढाऊ जाती आहेत. तेथें दळणवळण नव्हतें व ब्रिटिश सरकार रस्त्यावर पैसा खर्च करण्यास तयार नव्हतें. जोंपर्यंत तेथील जमाती आम्हांला उपद्रव देत नाहींत, तोंपर्यंत त्यांच्या वाटेस जाण्याचें कारण नाहीं असें ब्रह्मदेशचें सरकार म्हणे. ब्रह्मदेशच्या हद्दींत जर ट्युएंगसँग नागा जाते व हल्ले करते, तर त्यांनीं ब्रिटिशांच्या मागें त्यांच्या बंदोबस्ताबद्दल लकडा लावला असता.

ट्युएंगसँग ब्रिटिशांचें होतें; पण तेथें राज्यच नव्हतें. ही अनिष्ट परिस्थिति पाहून १९०२ सालीं एका हुकमान्वयें तेथील सारीं खेडीं गव्हर्नर जनरलच्या प्रत्यक्ष अखत्यारीखालीं आणलीं. गव्हर्नर जनरलसाहेब, त्यांचा कारभार आसाम गव्हर्नरमार्फत चालवत. १९३५ सालीं हिंदुस्थानविषयक जो कायदा झाला, त्यांतहि जुनीच व्यवस्था कायम ठेवण्यांत आली. १९४७ च्या हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या कायद्यांतहि तीच व्यवस्था चालू ठेवण्याची तरतूद करण्यांत आली. नागा लोकांना एवढें तरी कळावें कीं, ते ब्रिटिशांचे अंकित आहेत व त्यांची अगर त्यांच्याविरुद्ध असलेलीं गाऱ्हाणीं निकालांत काढण्याची सत्ता ब्रिटिश सरकारला आहे, असें ब्रिटिश अधिकाऱ्यांना वाटे. त्या वेळची राज्यकारभाराची पद्धत विचित्र होती. तेथून तक्रारी आल्या म्हणजे एक तुकडी त्यांच्यावर पाठवीत. ती तुकडी आपल्या एका दौऱ्यांत कोणाला शिक्षा, कोणाला दंड, कोणाला शाबासकी देऊन परत येई. पुढें सारी सामसूम होई. १९१३ सालीं एक ठाणें वाकचँगला स्थापन केलें. ट्युएनसँगमध्यें अशा प्रकारें कांहीं भाग प्रत्यक्ष शासनाखालीं होता व कांहीं भागांत बेबंदशाही होती. आतां ती परिस्थिति बदलली आहे.

पण नागा प्रदेशांतच काय, पण साऱ्या नेफांत अशा टोळ्या व जमाती आहेत, कीं ज्यांच्यावर सत्ताच नाहीं. ब्रिटिशांनीं तिबेटबरोबर बोलणीं केलीं, हिंदुस्थानची हद्द निश्चित केली, ३०,००० मैलांचा नेफा प्रदेश स्थापन केला; पण ब्रिटिश सत्ता तेथें दैनंदिन कारभाराकरितां अस्तित्वांत नव्हती. फार तक्रारी आल्या म्हणजे सपाटीवरचे किंवा डोंगरपायथ्याचे अधिकारी तेथें जाऊन येत

व थातुरमातुर करून परत जात. ब्रिटिशांचें नेफामधील राज्य असें नामधारीच होतें. भक्कमपणें राज्य करण्यास पैसा व श्रम लागतात व त्याला ब्रिटिश तयार नव्हते.

भारताच्या स्वातंत्र्यानंतर ती परिस्थिति बदलली. भारत सरकारनें साऱ्याच उपेक्षित, एकट्या पडलेल्या, दूर दूर असणाऱ्या, डोंगराळ प्रदेशांत अनुशासनाची व्यवस्था केली. १९५० सालीं व १९५४ सालीं त्या विभागाकरितां केलेल्या कायद्यांत शासनाची तजवीज करण्यांत आली. त्या शासनाबरोबरच त्या विभागांच्या विकासाचीहि व्यवस्था हातीं घेतली गेली.

मि.एन एल्विननीं १९५४ सालीं २०० मैल ट्युएनसँग विभागांत पायीं प्रवास केला. दुसरें प्रवासाला साधनच नव्हतें. त्यांना नव्या राजवटींत तेथील टोळीवाले समाधानी दिसले. लोकांना मुख्यतः शांतता हवी होती. मधूनमधून कोणा तरी लुटारूनें यावें, मालमत्ता, गुरेढोरें पळवावीं, लोकांना मारावें, त्यांची डोकीं तोडावीं, ह्या गोष्टीला नागा लोक कंटाळले होते. अर्थात् अद्यापपर्यंत आपसांतील वैरें, मुंडकीं तोडणें वगैरे संपूर्णपणें थांबलेलें नाहीं. पण त्याचें स्वरूप उग्र व भयंकर नाहीं. भारत सरकारच्या या राज्यव्यवस्थेबद्दल नागा-लोक संतुष्ट आहेत. त्यांना शांतता हवी होती, ती मिळाली. आतां ते शेतीकडे लक्ष देत आहेत. लोकांनीं आपणांहून ७३ शाळा काढल्या व चालवल्या आहेत. १९५४ नंतर आणखी प्रगति त्यांनीं खास केली आहे. त्यांना रस्ते, दवाखाने, शाळा पाहिजे आहेत व श्रमदान करावयास ते तयारहि आहेत.

ब्रह्मदेशची सरहद्द ट्युएनसँगला लागून आहे. पूर्वी सरहद्दीच्या अलीकडच्या पलीकडच्या तक्रारींचा निकाल उभय देशांतील टोळीवाल्यांचे पुढारी लावत. आतां ब्रह्मदेशाचा संबंध उरला नाहीं. जें काय कायदेशीर व न्याय्य आहे तेंच आतां सरकारमार्फत होत आहे. ट्युएनसँगच्या जनतेनें नव्या कारभाराबद्दल भारत सरकारचे अनेक वेळां आभार मानले व कृतज्ञता व्यक्त केली.

भारतीय स्वातंत्र्यानंतर तेथील जंगलांतून, पहाडांतून, डोंगरांतून रस्तेच रस्ते होऊं लागले. जंगलांत राहणें निर्धारतपणाचें झालें. त्यांनीं कांहीं जंगलें साफ केलीं, जमीन नांगरली व तेथें शेती सुरू केली. त्यांच्यांतील मुलेंमुली शाळेंत जात आहेत, हिंदुस्थानांतील विद्यापीठांतहि हुशार विद्यार्थी उच्च

शिक्षण घेत आहेत. कांहीं परदेशांतसुद्धां शिक्षणाकरितां विद्यार्थी गेले आहेत. नागा लोकांना भडकवण्याचा प्रयत्न कांहीं राजकीय पुढाऱ्यांनीं स्वातंत्र्यानंतर सुरू केला आहे. तुम्ही स्वतंत्र राष्ट्र आहांत, हिंदुस्थानचें सार्वभौमत्व तुम्ही मान्य करूं नका असें ते पुढारी त्यांना सांगत आहेत. नागा लोक पूर्वींपासूनच ब्रिटिश प्रजाजन होते. ब्रिटिश राज्य गेल्यावर ते भारताचे प्रजाजन झाले. पण ही दुय्यम भूमिका त्यांच्यांतील कांहीं पुढाऱ्यांना व बाहेरील कांहीं उपद्व्यापी लोकांना मान्य नाहीं. म्हणून आज जरी तेथील जनता संतुष्ट असली व शांततेंत नांदत असली, तरी कांहीं विघ्नसंतोषी लोकांना त्यांना सुखांत राहूं द्यावयाचें नाहीं. अशाहि पुढाऱ्यांना वळविण्याचे प्रयत्न चालू आहेत. त्यांतून काय निर्माण होईल तें पहावें. या सर्वांत समाधानाची एकच गोष्ट आहे. ब्रह्मदेशची सरहद्द जरी नागभूमीला भिडली असली, तरी पाकिस्तान चीन-प्रमाणें ब्रह्मदेश सरहद्दीचा वाद काढून उपद्रव देत नाहींत. अन्यथा तीहि एक डोकेंदुखी झाली असती.

# ३–हिंदुस्थानांतील आदिवासी

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अशा दोन जमातींचा भारतीय घटनेंत उल्लेख आहे. अनुसूचित जाती म्हणजे हरिजन किंवा अस्पृश्य. हा वर्ग समाजांतच रहात असे, त्यामुळें त्यांच्याकडे लक्ष जाणें स्वाभाविक होतें. हरिजनांच्या उद्धाराचें काम डॉ. आंबेडकरांनीं व म. गांधींनीं केलें. त्यामुळें तो समाज आतां सुधारूं लागला आहे. पण आदिवासी समाजांत कोणी डॉ. आंबेडकरांच्या तोडीचा नेता निर्माण झाला नाहीं. म. गांधींनीं आदिवासींचा प्रश्न हातीं घेतला होता. सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे श्री. अमृतलाल ठक्कर यांनीं त्या कार्याला वाहून घेतलें होतें. तथापि त्याच जमातींतील कोणी नेता पुढें येता, तर त्यांनीं पुढारलेल्या समाजावर प्रचंड आघात केले असते व त्यांची दृष्टि आपल्याकडे वळविली असती. शतकानुशतकें लोटलीं तरी भारत एक आहे म्हणणारांनीं ह्या डोंगरांत व जंगलांत रहाणाऱ्या लोकांची कधीं चौकशी केली नाहीं, कधीं त्यांचीं दुःखें समजून घेतलीं नाहींत, त्यांना वर आणण्याचा प्रयत्न केला नाहीं. हिंदुस्थानांतील धर्मांतरें याचमुळें होत गेलीं. ख्रिस्ती मिशनरी आदिवासी किंवा हरिजनांत गेले व धर्मांतर करूं लागले म्हणजे आमचीं डोकीं उठतात व आम्ही स्वतःवर टीका न करतां ख्रिस्ती किंवा बुद्ध किंवा मुस्लिम धर्मोपदेशकांवर आग पाखडतों. म. गांधींनीं हरिजनांत चळवळ

९५८

करूनहि लाखों हरिजन बुद्ध झाले. डॉ. आंबेडकरांच्यामुळें ते ख्रिश्चन झाले नाहींत किंवा अन्य धर्मांत गेले नाहींत हे डॉ. आंबेडकरांचे उपकारच. हरिजन बुद्ध कां झाले, याचा विचार कोणी करीत नाहीं. राष्ट्रीय ऐक्यावर भर देणारांनीं त्या ऐक्याची मूळ बैठक कोणती ह्याची कधीं चिंता केली नाहीं. भारताचें राज्य निधर्मी आहे हें खरें आहे. पण निधर्मी राज्यांतहि राष्ट्र एकत्र ठेवण्याचीं कांहीं बंधनें असतात व तीं बंधनें धार्मिक आहेत. धर्मामागून किंवा धर्माबरोबर राजकारण येतें. पाकिस्तानची निर्मिति धर्मातून झाली हें आपण आपल्या डोळ्यांदेखत पाहिलें. भारतानें मुस्लिम, ख्रिस्ती, पारशी वगैरे धर्मांतील अल्पसंख्याकांना न्यायानें व समतेनें वागविलें; पण धर्मांचा उच्चार करायचा नाहीं म्हटलें तरी पाकिस्तान हिंदूंची हकालपट्टी किती क्रूरतेनें करीत आहे हें पाहिलें म्हणजे आपण स्वतः निधर्मी असून भागत नाहीं; तर शेजारीपाजारीहि निधर्मी असावे लागतात असें वाटूं लागतें. पण ज्यानें त्यानें निदान स्वतःचे धर्म सांभाळले पाहिजेत एवढें निश्चित आहे.

अनुसूचित जमाती किंवा आदिवासींची भारतांत लोकसंख्या २॥ कोटी आहे. २॥ कोटी लोकांचा हा समाज उपेक्षित आहे. त्यांना भारतीय राज्यघटनेनें संरक्षणें दिलीं आहेत, प्रतिनिधित्व, अग्रहक्क वगैरे दिले आहेत. त्यांच्या विकासाकरितां व प्रगतीकरितां कोट्यवधि रुपये खास राखून ठेवले आहेत. पण सरकारमार्फत हीं विकासाचीं कामें होत असल्यामुळें त्या कामांत जिव्हाळा, कळकळ अभावानें असते. आजकाल सार्वजनिक कामें करणाऱ्या संस्थाच घसरगुंडीला लागल्या आहेत. त्याचीं कारणें व त्याचे परिणाम याचा विचार करण्याचें हें स्थळ नाहीं. पण ती परिस्थिति चिंताजनक आहे एवढें खास.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर त्यानें ह्या २॥ कोटी लोकांकडे विशेष लक्ष दिलें. जवाहरलाल नेहरूंनीं आदिवासी जमातीबद्दल आपलें धोरण काय राहील याचीहि घोषणा केली. ते म्हणाले, ' या जमातींना आपलें जीवन स्वतःच्या मर्जीनुरूप घालविण्याचा संपूर्ण अधिकार आहे हें वाटावयास लावणें हा मुख्य प्रश्न आहे. त्यांना आपल्या इच्छेप्रमाणें व बुद्धीप्रमाणें विकसित होऊं दिलें पाहिजे. हिंदुस्थान म्हटला कीं, ती एक संरक्षक शक्ति आहे, एवढेंच नव्हे, तर ती मुक्त करणारी शक्ति आहे हें त्यांना वाटलें पाहिजे. हिंदुस्थान म्हणजे एक शासक देश आहे व आपण शासित आहोंत ही कल्पना किंवा आपल्या परिच-

याच्या नसणाऱ्या चालीरीती आपल्यावर लादल्या जाणार आहेत ही कल्पना त्यांना आपल्यापासून विभक्त करील.' भारताच्या पंतप्रधानांचें हें औदार्यपूर्ण धोरण वेळोवेळीं प्रतिबिंबित झालें आहे. आदिवासी समाज हा मागासलेला आहे व त्याच्याकरितां कांहीं निराळी व्यवस्था पाहिजे, हें ब्रिटिश सरकारच्या वेळेपासूनच गृहीत धरण्यांत आलें होतें. त्यांत कांहीं चूक होती असें नाहीं. मागासलेल्या जातीजमातींना विशेष सहाय्य करावें व त्या जमाती व पुढारलेला वर्ग यांच्यांतील अंतर कमी करावें अशीच पूर्वींपासून दृढ समजूत होती. ब्रिटिशांनीं राजकीय पातळीवरून हें धोरण अवलंबिलें व त्यांचा वारसदार झालेला भारत त्याच धोरणाला अनुसरून वागत आहे. भारतांत विद्यमान असलेले कायदे आदिवासींना लागू नसत. त्यांचे पारंपारिक कायदे चालू ठेवण्यांत आले होते.

१८७४ सालीं आसाम प्रांत बनविण्यांत आला. नागा लोक हे त्यापूर्वी बंगालच्या ले. गव्हर्नरच्या कक्षेंत होते. ते १८७४ मध्यें आसाममध्यें आले व ते आसामच्या चीफ कमिशनरच्या ताब्यांत गेले. आसाममध्यें बरेच अनुसूचित जिल्हे (Scheduled Districts) निर्माण झाले. असें होतां होतां १८८० सालीं फ्रँटिअर ट्रॅक्ट्स रेग्युलेशन तयार करण्यांत आला. त्या रेग्युलेशनप्रमाणें अनुसूचित जिल्ह्यांना जे कायदे सोईस्कर वाटणार नाहींत, ते लावूं नयेत असें ठरलें. क्रिमिनल प्रोसिजर कोड, सिव्हिल प्रोसिजर कोड यांसारख्या गुंतागुंतीच्या कायद्याऐवजीं सोपे कायदे तयार करण्यांत आले. खेड्याखेड्यांतून होणाऱ्या गुन्ह्यांचे निकाल तेथील ग्रामप्रमुखानें लावावेत व वकील देऊं नये असें ठरलें. नागा प्रदेशांत जिल्हा मंडळें हीं चांगलीं वाढत गेलीं. त्याच पायावर जिल्हा स्वराज्य नागभूमींत अस्तित्वांत आलें.

१९१९ सालच्या कायद्यांत गव्हर्नर जनरलला अशी सत्ता देण्यांत आली कीं, त्यानें कोणत्याहि विभागाला मागासलेला विभाग म्हणून जाहीर करावें. त्या अधिकारान्वयें पुढील दहा वर्षांत ह्या मागास विभागांचें क्षेत्रफळ अंदाजें ३१० लाख चौ. मैल झालें व त्यांतील वस्ती १ कोट १० लाखांवर गेली. हे मागास विभाग पांचच प्रांतांत होते. ह्या विभागावर ग. जनरल व त्याचे प्रतिनिधि म्हणून गव्हर्नर्स प्रत्यक्ष अंमल चालवीत. कायदेमंडळापुढें त्यांच्या-वरील खर्च किंवा कायदे चर्चेला येण्याची जरुरी नसे. या धोरणाचा उद्देश

आदिवासींची झपाट्यानें सुधारणा करावी असा होता. नागा लोक आतां असें म्हणत आहेत कीं, ज्या अर्थीं आमच्यासंबंधींचे कायदे, खर्च वगैरे ग. जनरलच्या अखत्यारींत होता, त्या अर्थीं आम्ही स्वतंत्रच होतों व तें स्वातंत्र्य आम्हांला मिळालें पाहिजे. पण ग. जनरलच्या ताब्यांत एकटे नागाच नव्हते; इतर आदिवासीहि होते. त्या सर्वांनाच स्वातंत्र्य द्यायचें का? याचा अर्थ जे नागांच्या व इतरांच्या सुखसमृद्धीकरितां केलें, त्याचें पर्यवसान त्यांच्या स्वातंत्र्यांत व्हावें अशी त्यांची मागणी. पाकिस्तानच्या मागणी-प्रमाणेंच ही भयंकर मागणी आहे. ब्रिटिशांनीं ही मागणी मान्य केली नाहीं.

सायमन कमिशन १९२८ सालीं जेव्हां येथें आलें, तेव्हां या मागणीला वाचा फुटली. सायमन कमिशन नागांना कोहिमा येथें भेटलें. तें कमिशन डिब्रुगडच्या पलीकडेहि मुलाखतीला गेलें होतें. त्या कमिशननें या लोकांचें फार चांगलें वर्णन केलें. आधुनिक सुधारणांशीं त्यांचा संबंध आला तर त्यांचें मूळचें पाणी लुप्त होईल असेंहि तें कमिशन म्हणालें. सायमन व कॅडोगन यांनीं त्या लोकांना मागासलेले म्हणण्यास हरकत घेतली. आदिवासींच्या चालीरीती भिन्न आहेत म्हणून त्यांना मागासले म्हणणें तिरस्करणीय आहे असें कमिशनच्या कांहीं सभासदांना वाटलें.

सायमन कमिशनपूर्वीं या विभागांना 'बॅकवर्ड ट्रॅक्ट्स' म्हणत. सायमन कमिशननें त्यांना 'एक्स्क्लुडेड एरिआज' असें नवें नांव दिलें. त्या वगळलेल्या विभागांत 'संपूर्णतः व अंशतः वगळलेले' असे पुनः दोन प्रकार करण्यांत आले. आदिवासींच्या लोकवस्तीप्रमाणें हे प्रकार करण्यांत आले. जेथें मधून मधून विखुरलेले आदिवासी रहात, ते अंशतः वगळलेले विभाग. ह्या दोन्ही प्रकारच्या विभागांत सामावलेल्या आदिवासींना मध्यवर्ती किंवा प्रांतिक सरकारचे कायदे लागू नसत. त्या सर्वांचा उद्देश या जमातींची झपाट्यानें प्रगति करण्याचा होता.

१९३५ चा कायदा जेव्हां जेव्हां ब्रिटिश पार्लमेंटमध्यें चर्चेला आला, तेव्हां वगळलेल्या विभागाचें क्षेत्र वाढविले गेलें. चर्चिलसाहेब हे स्वतः त्या 'वगळण्याच्या' तत्त्वाविरुद्ध होते. हिंदी लोकांवर तुम्ही महत्त्वाची जबाबदारी टाकीत असतां त्यांना लहान-सहान जमातींचा प्रश्न हाताळतां येणार नाहीं असें धरून कां चालतां असा युक्तिवाद त्यांनीं केला. त्यांचें म्हणणें असें होतें

कीं, हिंदुस्थानांतील विशिष्ट भाग, लोकांच्या अधिकारक्षेत्रांतून वगळण्याऐवजीं सारा हिंदुस्थानच वगळलेला भाग म्हणून ठरवावा. चर्चिलसाहेब हे हिंदी स्वातंत्र्याचे विरोधक होते, म्हणून त्यांचा हा युक्तिवाद. पण पार्लमेंटच्या चर्चेंत बराच रंग भरला. साऱ्या ब्रिटिश सभासदांना आदिवासींचा पान्हा फुटला होता. हिंदु किंवा हिंदी लोक हे आदिवासींचे शत्रु आहेत; ते त्यांचा नाश करतील; आम्हीच त्यांचें हित केलें आहे व करणार आहों असा एकंदर टीकेचा सूर होता.

१९३५ च्या कायद्याप्रमाणें नागा हिल जिल्हा, नेफा, लुशाई हिल्स व उत्तर काचार हिल्स हे चार विभाग आसाम गव्हर्नरच्या खास नियंत्रणाखालीं आले. स्वातंत्र्यानंतर त्या व्यवस्थेंत कांहीं फारसा बदल झाला नाहीं. सत्ता गव्हर्नरकडेच राहिली; पण त्यानें मंत्र्यांच्या सल्ल्यानें कारभार करावा एवढा बदल करण्यांत आला. १९५० च्या भारतीय राज्यघटनेच्या कायद्यांत 'वगळलेले व अंशतः वगळलेले' असे विभाग रद्द केले व त्याच्या जागीं 'अनुसूचित विभाग' असा नवा शब्दप्रयोग आला. या अनुसूचित जमातींची फार लांबलचक यादी देण्यांत आली व त्या यादींत नागांचा समावेश केला. नवा शब्दप्रयोग हा फक्त नांवाचा नाहीं. पूर्वीं आदिवासींचें फक्त संरक्षण केलें जात असे; आतां त्यांचें संवर्धन किंवा विकास याची जबाबदारी सरकारनें घेतली. भारतीय राज्य-घटनेच्या पांचव्या व सहाव्या परिशिष्टांत अनुसूचित विभागांत कारभार कसा करावा याचा तपशील दिला आहे. त्या तपशीलावरून आदिवासींच्या बाबतींत भारत सरकारनें काय काय नवा उपक्रम केला आहे याची कल्पना येते.


पूर्वीं अनुसूचित विभाग गव्हर्नरच्या ताब्यांत असत. पांचव्या परिशिष्टा-प्रमाणें राज्याची सत्ता अनुसूचित विभागांतहि जारी करण्यांत आली. मात्र ज्या राज्यांत अनुसूचित विभाग असेल, त्या राज्याच्या गव्हरर्नरनें राष्ट्रपतींना दरसाल किंवा राष्ट्रपति सांगतील तेव्हां त्या विभागांतील अनुशासनाचा अहवाल सादर करावयाचा आहे. मध्यवर्ती सरकारला त्यासंबंधीं राष्ट्रपति सूचना देऊं शकतील. तेव्हां भारतीय राज्यघटनेंत हें नवें पदार्पण करण्यांत आलें. लोकशाही राज्यांत सर्व कारभार लोकप्रतिनिधींच्या हातीं जावयास पाहिजे असतो. ब्रिटिश राजवटींत लोकशाही नव्हती. म्हणून गव्हर्नर हा आदिवासींचा पालक होता.



युद्धाच्या वेषांत नागा पुरुष



नागालँडचे रहिवासी



नागालँडमधील एक खेडें

५४२३३ दि: ... ... बोर दि: ...

पण त्या पालकानें आदिवासींचे फारसें कल्याण केलें नाहीं. त्यांना ब्रिटिश राज्य सांभाळावयाचें होतें. त्यांतच त्यांचा वेळ जाई. मग आदिवासीकडे ते कसले लक्ष देतात?

भारतीय राज्यघटनेनें नवी जमात मंडळें स्थापन केलीं. त्या मंडळांत तीन चतुर्थांश अनुसूचित जमातींचे प्रतिनिधी असतात. आसाम राज्यांत अनुसूचित विभाग आहेत. ते विभाग त्याच जमातींचे आहेत. त्यांना नव्या घटनेंत स्वायत्तता दिली आहे.

भारतीय राज्यघटनेंत त्या जमातींचे दोन वर्ग केले आहेत. एक पुढारलेली व दुसरी मागासलेली. अ व ब असे त्यांचे भाग आहेत. नागा हिल्स जिल्हा हा अ भागांत होता व नागा जमात विभाग हा ब भागांत होता. पण हे दोन्ही विभाग १९५७ च्या 'नागा हिल्स ट्युएंग एरिआ ॲक्ट' च्या ३ च्या कलमानें जोडले गेले. पुढें १९६० मध्यें नागांचें एक निराळें १६ वें राज्य करण्यांत आलें.

अनुसूचित जमाती व विभाग यांना स्वयंशासनाचे हक्क मर्यादित प्रमाणांत दिले होते. पण त्याची चर्चा येथें करण्याचें कारण नाहीं. तो एक स्वतंत्र विषयच आहे. हे जे निरनिराळे अधिकाराचे प्रकार वेळोवेळीं जन्माला आले, त्यांचा एकत्रित विचार करावा व घटनेंत बदल करावा, याकरितां श्री. पाटसकर यांच्या अध्यक्षतेखालीं एक मंडळ नेमलें गेलें. त्या मंडळाला भारताच्या एकात्मतेच्या दृष्टीनें नवे बदल करावे लागतील. पण ह्या जमाती व विभागाविषयीं जवाहरलाल नेहरू यांनीं जें धोरण ठरविलें होतें, त्या धोरणाशीं विसंगत असें त्यांना कांहीं करतां येणार नाहीं. १९६२ च्या चिनी आक्रमणानंतर नेफा, लडाख वगैरे भाग आपल्या प्रत्यक्ष ताब्यांत नसला तरी त्यासंबंधीं कायदे करणें जरूरीचें झालें आहे. तथापि त्या आक्रमणानंतरहि नेहरूंचें धोरण बदललेलें नव्हतें. जमातीविषयक पंचशिलांत त्यांनीं पांच तत्त्वें सांगितलीं.

( १ ) जमातीच्या लोकांनीं आपल्या उपजत बुद्धीप्रमाणें आपला विकास करावा. त्यांच्यावर आपण कांहींहि लादूं नये. त्यांच्या पारंपारिक कला व संस्कृतींना आपण उत्तेजन द्यावें.

( २ ) जमीन व जंगल यांतील जमातींचे हक्क अबाधित ठेवावे.

( ३ ) शासन व विकासाचीं कामें करण्याकरितां त्यांच्याच लोकांना शिक्षण

द्यावें. जमातीच्या विभागांत बाहेरचे पुष्कळ लोक आणण्याचें आपण टाळावें.

( ४ ) त्या विभागांत किचकट अनुशासन नसावें. तेथें अनेक योजना नसाव्यात. त्यांच सामाजिक व सांस्कृतिक संस्थांमार्फत आपण कामें करवून घ्यावींत.

( ५ ) आपण परिणामांचें मूल्यमापन आंकड्यावरून किंवा खर्च केलेल्या पैशांवरून धरूं नये. मानवी स्वभावाच्या गुणवृद्धीवरून आपण त्यांच्याकडे पहावें.

नागासंबंधीं जवाहरलालजींचें धोरण हें पहिल्यापासून एकच होतें. स्वातंत्र्य-प्राप्तीपूर्वींहि ते म्हणत कीं, नागांनीं आपला कारभार आपल्याच निवडून आलेल्या लोकांमार्फत करावा. तेथें म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्डें वगैरे न स्थापतां, त्यांच्याच पंचायती, त्यांची जमात, न्यायमंडळें यांच्या हातीं तो कारभार द्यावा. नागाभूमीची वाढ व उत्कर्ष त्यांनींच करावा. हिंदुस्थान आपला आहे असें त्यांनीं मानावें. हिंदुस्थानपासून त्यांनीं अलग व्हावें असें जवाहरलाल कधीं म्हणाले नाहींत. हिंदुस्थानांत राहून त्यांच्या ऐक्यांत भागीदार होऊन त्यांनीं आपला विकास आपल्या संस्कृतीला, चालीरीतीला अनुसरून करावा असें ते म्हणत. गोव्यासंबंधीं त्यांचें हेंच धोरण होतें. गोव्यानें आपल्या संस्कृतीचें व परंपरेचें रक्षण करावें व दहा वर्षांनंतर त्यांनीं आपल्या भवितव्याचा विचार करावा असें ते म्हणत. तेव्हां जेथें जेथें पूर्वसंस्कृति व परंपरा असेल तेथें तेथें भारतीयांनीं आपली संस्कृति लादूं नये हें त्यांचें म्हणणें.

नागा लोक हें धोरण मान्य करीत. पण म्हणत, ‘तुमचें म्हणणें आम्हांला मान्य आहे. पण तुमचे खालचे अधिकारी या वृत्तीनें वागत नाहींत. ते नागा-लोकांवर प्रभुत्व गाजवतात व त्यांना आपल्या इच्छेनुरूप राबवतात.’ पण कांहीं अधिकारी व नोकर हे आपल्या तोऱ्यांत असले तरी त्या जमातींत वागतांना सामान्यपणें ते आपली भूमिका व सरकारी धोरण यांना मान देतात. नागांनीं त्याबद्दल तक्रार करावी व स्वातंत्र्य मागावें असें हिंदुस्थानकडून कांहींहि घडलें नाहीं.

**नागांचें बंड :**

हिंदुस्थान एक आहे, त्यांत एकात्मता आहे, वगैरे गोष्टी सांगणाऱ्या

आम्हांला नागभूमींत बंड झालें व सर्वत्र अराजक माजलें याची कल्पना नाहीं. नागांचें हें बंड एकाएकीं उद्भवलें असें नाहीं. त्या बंडामागें इतिहास आहे. एकीकडे नागांना भारत चुचकारीत होता व दुसरीकडे त्यांच्याबद्दल कळवळा दाखविणारे त्यांना भडकवीत होते.

१९१८ सालीं कोहिमा व मोकोकचुंग येथें नागा क्लब नांवाची एक संघटना ब्रिटिश सरकारी अधिकारी व नोकर व खेड्याखेड्यांतील प्रमुख यांनीं स्थापन केली. त्या क्लबांत सामाजिक व शासनविषयक प्रश्न चर्चिले जात. पण त्या क्लबांत ब्रिटिश गोऱ्या अधिकाऱ्यांनीं नागांच्या मनांत असें खास भरविलें असावें कीं, आज ना उद्यां ब्रिटिश राज्यकर्ते हिंदुस्थानांतून जातील व त्याच वेळीं नागांना स्वतंत्र होतां येईल. मुस्लिम समाजाला भडकवणारे जसे ब्रिटिश लोक होते, तसें याहि जमातींना त्यांनींच भडकवलें असावें. जंगलांतून व पहाडांतून रहाणाऱ्या या नागा लोकांचें कितीहि प्रशंसापर वर्णन केलें तरी स्वतंत्र राष्ट्र मागण्याइतकी त्यांची प्रगति झाली होती असें सुबुद्ध माणूस तरी म्हणणार नाहीं.

१९२९ च्या जानेवारींत सायमन कमिशन कोहिमा येथें गेलें असतां नागांच्या एका शिष्टमंडळानें त्यांना असें सांगितलें कीं, तुम्ही ज्या सुधारणा भारताला देणार आहां, त्यांतून आम्हांला वगळा. आमच्यावर तुम्हीच राज्य करा व सपाटीवरील लोकांच्या जुलमापासून आमचें संरक्षण करा. नागा लोक ब्रिटिश सत्ता आपल्यावर रहावी, असें जे म्हणाले, ते स्वतःच्या बुद्धीनें खास म्हणाले नाहींत. पण त्याहीपुढें जाऊन त्यांचा पुढारी म्हणाला, 'तुम्हीच असे लोक आहांत कीं, ज्यांनीं आम्हांला प्रथम जिंकलें आहे. पण तुम्ही जातांच आम्ही जसें होतों, तसेंच राहूं.' याचा अर्थ उघड आहे. ब्रिटिश सत्ता संपतांच त्यांना पूर्वीप्रमाणें स्वतंत्र व्हावयाचें होतें. ही त्यांची मागणी स्वतःची नव्हती. ब्रिटिशांनींच शिकवल्यामुळें ते असें म्हणाले. जर सायमन कमिशनमध्यें हिंदी लोक असते, तर त्यांनीं त्यांना छेडून सत्य बाहेर आणलें असतें. सायमन कमिशननें आपल्या शिफारशींत नागांना संयोजित सुधारणांपासून वगळावें असें म्हटलें. पण नागांकरितां खास योजना कायद्यांत केली गेली नाहीं. नागा हिल्स जिल्हा हा इतर जमातीप्रमाणें वगळलेला विभाग म्हणून १९३५ च्या कायद्यांत ठरविण्यांत आला. त्यानंतर बराच काळ लोटला. नागाभूमींत यज्ञकुंड

पेटविण्यांत येत होतें. नागा लोक ब्रिटिशांशीं राजनिष्ठेनें वागत होते. दुसऱ्या महायुद्धांत त्यांनीं ब्रिटिशांना अमोल सहाय्य केलें व आपली राजनिष्ठा दाखवली. या काळांत बंगाल किंवा आसामचा कोणी कॉंग्रेस कार्यकर्ता त्यांच्याकडे गेला नाहीं व त्यांच्यांत राहिला नाहीं.

१९४५ मध्यें एक महत्त्वाची घटना घडली. त्या सालीं एप्रिल महिन्यांत सर चार्लस पॉसे यानें एक संस्था काढली. तिचें नांव ' नागा हिल्स डिस्ट्रिक्ट ट्रायबल कौन्सिल ' असें होतें. त्या संस्थेचें ध्येय सर्व नागांना एकत्र आणावें असें होतें. १९४६ च्या मार्चमध्यें या संस्थेची बैठक वोखा येथें भरली व तिनें आपलें नांव बदललें. नवें नांव ' नागा नॅशनल कौन्सिल ' असें धारण केलें. सामाजिक सुधारणा कराव्यात वगैरे सोज्वळ हेतु त्या संस्थेचे होते. सरकारनें या संस्थेला पुरेपूर आसरा दिला. या संस्थेतर्फे ' नागा नेशन ' ह्या नांवाचें एक छोटें वृत्तपत्रहि कांहीं वर्षे चालविलें गेलें होतें. त्या पत्राच्या नांववरूनच नागा हें स्वतंत्र राष्ट्र आहे असा ध्वनि निघतो.

पण या संस्थेचा बुरखा फार काळ टिकला नाहीं. १९४७ च्या जूनमध्यें त्यांनीं सरकारला निर्वाणीचा खलिता पाठविला कीं, जेव्हां भारत स्वतंत्र होईल, तेव्हां नागा हिल्स ह्या भारतांतून अलग करण्यांत याव्यात. नागांना आपलें राज्य हें स्वतंत्र व्हावयास पाहिजे होतें. पण या मागणीमुळें नागांत दुफळी झाली. कांहींना ताबडतोब स्वातंत्र्य हवें होतें व कांहींना भारताशीं संबंध ठेवून व राजकारण शिकून नंतर स्वातंत्र्य हवें होतें. तिसरा एक संप्रदाय होता. त्याचें म्हणणें नागालॅंड हें ब्रिटिश साम्राज्यांत मॅंडेटरी स्टेट कांहीं काळपर्यंत असावें.

नागालॅंडमध्यें हे उपद्व्याप चालले असतां पूर्वी आसाममध्यें असलेल्या एका गव्हर्नरसाहेबांनीं इंग्लंडहून आणखी एक पिल्लूं सोडून दिलें. नागालॅंड ही ' क्रौन कॉलनी ' करावी व ती ब्रिटिश साम्राज्याखालीं ठेवावी. रेजिनाल्ड कूपलंड ह्यांनीं आणखी एक सूचना केली. ब्रह्मदेश व हिंदुस्थान यांनीं ब्रिटिशांबरोबर तह करून नागालॅंडच्या रक्षणाची व अनुशासनाची जबाबदारी पत्करावी असें त्यांचें म्हणणें. पण त्यांपैकीं कोणत्याच सूचना ब्रिटिश पार्लमेंटनें स्वीकारल्या नाहींत हें हिंदुस्थानचें सुदैव. त्यानें नागालॅंडसह भारत स्वतंत्र केला. १९४७ सालीं नागाभूमींतून एक शिष्टमंडळ दिल्लीला गेलें. त्या मंडळानें अशी सूचना

केली कीं, भारत स्वतंत्र झाल्यावर त्यांनीं आपल्या युनियनमधून नागाभूमीला वगळावे. त्यानंतर थोड्याच दिवसांनीं आसामचे गव्हर्नर सर अकबर हैदरी हे कोहिमाला गेले, त्यांनीं नागा पुढाऱ्यांच्या बरोबर चर्चा केली; व हैदरी करार ज्याला म्हणतात, तो ९ कलमी करार तयार केला. त्यांतील नववें कलम महत्त्वाचें आहे.

आठ कलमांत जो करार झाला आहे, तो अंमलांत आणण्याची खास जबाबदारी भारतसंघाचा एजंट म्हणून गव्हर्नरवर १० वर्षें राहील. त्यानंतर तो करार आणखी लांबवावा का, नागांच्या भवितव्याबद्दल नवा करार करावा याबद्दल नागा नॅशनल कौन्सिलला विचारण्यांत येईल. या कलमाचा अर्थ कांहीं नागांनीं असा लावला कीं, ९ वर्षांनंतर आपण पूर्णपणें स्वतंत्र होऊं. नागांचें शिष्टमंडळ ९० व्या कलमाच्या अर्थाकरितां गव्हर्नर व मुख्य मंत्री श्री. बार्डोलाय यांना भेटलें. त्या दोघांनीं त्या कलमाचा अर्थ 'स्वतंत्र नागा राष्ट्र' असा होत नसल्याचें सांगितलें.

नागा नॅशनल कौन्सिलमध्यें जहाल मतांचे लोक शिरले व तें कौन्सिल त्यांनीं काबीज केलें. त्या कौन्सिलांत संपूर्ण स्वातंत्र्य मागणारे लोक तेवढे शिल्लक उरले. पुढें घटना परिषद भरली. त्या परिषदेची एक उपसमिति कोहिमाला गेली. त्या समितीनें नागांच्या करितां सहावें परिशिष्ट तयार करण्याची सामुग्री मिळवली. सहाव्या परिशिष्टाचा उद्देश, त्याची कार्यवाही वगैरेंबद्दल नागांना कल्पना दिली. हें परिशिष्ट खास तुमच्या कल्याणाकरितां जोडण्यांत येत असल्याचेंहि सांगितलें. पण नागा कौन्सिल संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करणाऱ्यांचें असल्यामुळें त्यानीं तें परिशिष्ट व तीं अभिवचनें झिडकारून लावलीं. नव्या घटनेप्रमाणें तेथें जिल्हा कौन्सिलच्या निवडणुका व्हावयाच्या होत्या. नागा लोक युद्धाच्या भूमिकेवर होते.

### बहिष्कार :

नव्या निवडणुकांवर त्यांनीं संपूर्ण बहिष्कार घातला. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकींत आसाम राज्याच्या कायदेमंडळाकरतां किंवा पार्लमेंटकरतां कोणीहि नागा उभा राहिला नाहीं. सरकारनें मात्र निवडणुकांची सारी तयारी केली. मतदारांच्या याद्या, मतदान केंद्रें, मतदान-पत्रिका, मतांच्या पेट्या

वगैरे सर्व तयारी केली. निवडणुकीच्या दिवशीं निवडणूक अधिकारीहि केंद्रां-केंद्रावर जाऊन बसले. पण हा खटाटोप कां केला हेंच समजत नाहीं. उमेद-वारांचा जेथें अर्जच नव्हता, तेथें मत कोणाला देणार ? त्या दिवशीं कोणीहि मतदार मताकरतां केंद्राकडे फिरकलाहि नाहीं. नागा लोक आजूबाजूला उभे राहून हंसत होते व सरकारची फटफजिती पहात होते. नागालँडचा प्रतिनिधि कायदे-मंडळांत गेला नव्हता. हिंदुस्थाननेंहि ह्या निवडणुकांवर बहिष्कार घालण्याचा प्रयोग १९२० च्या निवडणुकांत येथें केला होता. पण तो संपूर्णपणें यशस्वी झाला नव्हता. कांहीं ठिकाणीं टक्का दोन टक्का का होईना, पण मतदान झालें होतें व उमेदवार निवडून आल्याचें जाहीरहि झालें होतें. पण नागांच्या इतका कडक बहिष्कार भारतांत घातला गेला नाहीं.

१९५७ सालीं त्यांच्या अभेद्य ऐक्यांत फूट पडली. तिघे नागा आसाम राज्याच्या निवडणुकीकरितां उभे राहिले. त्यांना मतें देण्याकरितां एकहि नागा मतदार गेला नाहीं. त्यांची निवडणूक बिनविरोध झाली. त्यांतील एकाला आसामच्या विधानसभेंत उपमंत्री करण्यांत आलें.

१९५२ सालच्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी नागांनीं आपल्या स्वतंत्र होण्याच्या मागणीकरितां फार प्रचंड मोहीम केली. नागा पुढारी १९५१ मध्यें प्रत्येक खेडयांत गेले, त्यांच्या सह्या किंवा आंगठे घेतले, त्यांना शपथा घ्यावयास लावलें व ते सर्व आम्ही स्वातंत्र्याकरितां, सर्वस्व पणाला लावून लढूं याकरतां. त्यांनीं आपले सर्व पाठ हिंदुस्थानकडूनच घेतले होते. त्यांनीं सविनय कायदेभंग सुरू केला. लोकांनीं घरपट्टी देण्याचें व इतर कर देण्याचें नाकारलें. सरकारच्या विकासकामांत सहकार्य करण्याकरितां एकहि नागा पुढें आला नाहीं. त्यांनीं शिक्षकांना राजीनामे द्यावयास भाग पाडलें व विद्यार्थ्यांना शाळेंत जाऊं दिले नाहीं. सरकारी अधिकाऱ्यांना त्यांनीं मजूर मिळूं दिले नाहींत व त्यांना लागणाऱ्या वस्तूहि पुरवल्या नाहींत. खेडयांतील मुख्यांनीं आपले लाल डगले परत केले. कोणीहि सरकारी किंवा राष्ट्रीय समारंभाला हजर राहत नसे. इतका प्रचंड व सर्वांगीण बहिष्कार हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यकालाला सुरुवात होतांना पडला. जें हिंदुस्थाननें ब्रिटिशांच्या बाबतींत केलें, तेंच नागांनीं हिंदुस्थानच्या विरुद्ध केलें.

पण नागांची ही चळवळ अहिंसात्मक राहिली नाहीं. जे सरकारी नोकरी

करूं लागले, त्यांच्यावर बहिष्कार घातला गेला. त्यांना धमकीचीं पत्रें जाऊं लागलीं. सभासभांतून त्यांचा नांवानें धिक्कार होऊं लागला आणि कांहींजणांचे तर खूनहि करण्यांत आले. नागा बंडखोरांनीं रस्ते उध्वस्त केले, पूल पाडले व सरकारी इमारतींना आगी लावल्या. दोन तीन वर्षें हे प्रकार चालले होते. भारत सरकार नागांचे हे अत्याचार निमूटपणें सहन करीत गेले. ब्रिटिश राजवट जर असती, तर या नागा लोकांचा केव्हांच फडशा पडला असता.

१९५३ च्या अखेरीस नागालोकांच्या वृत्तींत कांहींसा बदल झाला. त्या वेळीं त्यांनीं एक सदिच्छा मंडळ आसामच्या भागांत पाठविलें. पंधरा दिवस ते मंडळ ठिकठिकाणीं हिंडलें. त्यांचें स्वागत चांगलें झालें. त्यांना कोठेंहि वैर किंवा दुजा भाव दिसून आला नाहीं. तें सदिच्छा मंडळ कॉंग्रेसच्या पुरस्कारानें निघालें होते. त्या मंडळाला त्यांच्याविषयीं जनतेंत आपलेपणा आढळला तरी त्यांनीं सरकारी अधिकाऱ्यावर भलभलते आरोप आपल्या अहवालांत केले आणि सदिच्छा मंडळाचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले.

पण या सदिच्छा मंडळापूर्वीं म्हणजे १९५३ मध्यें कांहीं जहाल नागा पुढाऱ्यांनीं सशस्त्र बंडाचा उठाव करण्याचें ठरविलें. बहिष्कार, कायदेभंग, करबंदी व तडजोडी यांत यश न आल्यामुळें तो वर्ग बेफाम झाला. नागा नॅशनल कौन्सिलनें ह्या अत्याचाराला कधींहि मान्यता दिली नव्हती. त्या कौन्सिलबाहेर ज्वलज्जहाल लोक होते. त्यांचा पहिला बेत टयुएंगसँगमधील खेडयांत जी नवी राज्यव्यवस्था सुरू झाली होती, तेथें आपले हस्तक पाठवावे, त्यांतील युयुत्सु लोकांना आपल्या बंडांत दाखल करावें व ब्रह्मदेशच्या सरहद्दीला लागून असलेल्या विभागांतून बंड पुकारावें असा होता. तो बेत त्यांनीं अंमलांत आणला. टयुएंगसँग विभागांत त्यांनीं मुंडकीं कापण्याची जुनी मोहीम सुरू केली. तीं मुंडकीं ते आपसांत उडवूं लागले. गांवागांवांतील वैरें विकोपाला पोहोंचलीं. त्याला राजकीय स्वरूप नव्हतें.

१९५६ च्या मार्च महिन्यांत त्या बंडवाल्यांनीं ' नागा फेडरल गव्हर्नमेंट ' ची स्थापना केली. २२ मार्चला त्यांनीं फेनसिन्द ह्या रेंगमा खेडयांत आपलें निशाण उभारलें. पण या बंडवाल्यांना लोकांचा पाठिंबा नव्हता. त्यांची संघटना लवकरच मोडकळीस आली. पण त्यांनीं आपली एक घटना बनविली. त्या घटनेंत त्यांनीं पुढील गोष्टी घातल्या–' नागा लँड हें जनतेचें सार्वभौम प्रजासत्ताक आहे.

तें तसें अनादि कालापासून आहे. त्या प्रजासत्ताकाचें एक पार्लमेंट असेल व त्यांत १०० तातार्स ( एम्. पी. ज ) असतील. अध्यक्षांची निवडणूक लोक करतील व त्याच्या मंत्रिमंडळांत १५ किलोनसर्स ( मंत्री ) असतील.

' नागा लँड लष्करी दृष्टया तटस्थ राहील. कायदा व सुव्यवस्थेकरितां खडी फौज असणार नाहीं. होमगार्ड खातें हे पोलीस व देशभक्त सैनिक ह्या दुहेरी नात्यानें अस्तित्वांत असेल. ''

त्यांच्या घटनेचा येथें सारांश दिला आहे. पण त्या घटनेवर सही करणारा कोणी तरी हवा होता. मि. हॅंगखिन ह्या किलोनसरनें ( मंत्र्यानें ) सही केली. त्याला नागा सरकारचें प्रमुख म्हणून जाहीर केले. हा हॅंगखिन वृद्ध गृहस्थ ब्रह्मी सरहद्दीला लागून असलेल्या एका खेडयांत रहात होता. त्याच्याकडे कांहीं बंडखोर गेले व तुला अध्यक्ष करतों म्हणाले आणि त्यानें ती गोष्ट मान्य केली. नंतर बंडखोरांनीं त्याच्या अंगावर युरोपियन पद्धतीचा पोषाख चढवला, त्याच्या तोंडांत एक पाईप घातली, त्याचा फोटो काढला. त्यामुळें तो मोठा खूष झाला. पण फोटो काढून घेतल्यावर आतां तो पोषाख आमच्या स्वाधीन करा असें बंडखोर त्याला म्हणाले. त्या वृद्ध गृहस्थांचा स्वातंत्र्याचा उत्साह त्यामुळें पार मावळला. नागांच्या फेडरल रिपब्लिकची घटना ही कोणीतरी घटनातज्ज्ञानें तयार केली असावी. मग ते तज्ज्ञ नागा असोत किंवा मिशनरी असोत. ती घटना सुसंबद्ध नव्हती. पण ज्याला मूलभूत हक्क म्हणतात, त्याचें दिग्दर्शन त्या घटनेंत होतें. ही घटना कार्यान्वित करण्याकरितां त्यांनीं निरनिराळे अधिकारी नेमले, परराष्ट्रांत पाठविण्याकरितां वकील नेमले, फेडरल हायकोर्ट वगैरेंची स्थापना केली. गव्हर्नर्सहि नेमावयास त्यांनीं कमी केलें नाहीं. सैन्याची उभारणीहि करण्यांत आली. कमांडर्स, मेजर जनरल वगैरे हुद्देहि अधिकारी म्हणून सेनानींना देण्यांत आले. स्त्रियांची पलटणहि रणांगणावर नर्सिंग, संदेशवाहन, पाकसिद्धि वगैरे कामें करण्याकरितां स्थापन केली.

पण हे सर्व झाले, तरी दारुगोळा, शस्त्रास्त्रें कोठून आणावयाचीं ? दुसऱ्या महायुद्धानंतर बराच दारुगोळा व शस्त्रास्त्रें नागालँडमध्यें दोस्तांकडून सोडून देण्यांत आलीं होतीं. त्याचा साठा नागांनीं केला होता व तो दडवून ठेवला होता. त्याचा ताबा लष्करानें घेतला व आणखी शस्त्रास्त्रें त्यांनीं मणिपूर वगैरे ठिकाणीं खरेदी करण्यास सुरुवात केली. त्यांनीं तेथील पोलीस ठाण्यावर हल्ले

करून शस्त्रास्त्रांची लुटालूट केली. स्थानिक कारागीर बंदुका वगैरे तयार करूं लागले. त्या सर्वांचा उद्देश आपलें राज्य स्वतंत्रपणें चालवावें असा होता.

पण त्याकरितां आधीं बंड यशस्वी करणें जरूर होतें. नागांनीं अत्याचारांना सुरुवात केली. साऱ्या नागभूमींत त्यांनीं बंडाची उठावणी केली. त्यांनीं लूट, जाळपोळ, खून, दमदाटी, धमक्या वगैरेंचा अवलंब केला. त्यांनीं भारत सरकारच्या ठाण्यांवर व अधिकाऱ्यांवरहि हल्ले केले. सरकारी पोलीस व सैन्य अपुरें पडूं लागलें. बंडखोरांचा विजय ठिकठिकाणीं होऊं लागला. १९५६ च्या सुरुवातीला बंडखोरांची सुमारें ५००० ची गनिमी काव्यानें लढणारी सेना डोंगराडोंगरांतून खडी होती. पुढें हें सैन्य १५००० झालें. सरकारनें या बंडाचा बींमोड करण्याचें काम आपल्या सैन्यावर सोपविलें. तें सैन्य डोंगरांत शिरूं लागलें. पण नागा बंडाचा उठाव एवढा प्रचंड होता कीं, भारतीय सैन्य त्यांच्यापुढें टिकाव धरूं शकत नव्हतें.

हे बंडखोर बंडाला लागणारा पैसा नागा लोकांवर जबरदस्ती करून अगर लुटालूट करून मिळवीत. लोकांना स्वातंत्र्य हवें होतें व त्या स्वातंत्र्याचीं सारीं सुखें हवीं होतीं. पण त्याकरितां त्यांना आपला पैसा लुटला जावयास नको होता. दुसऱ्यांची लूट करण्यांत ते सहभागी झाले असते; पण आपली लूट होऊं लागल्यामुळें तेहि विरोधी होऊं लागले. नागा बंडखोरांनीं आपल्या विरोधकांचा निकाल लावण्यास कमी केलें नाहीं. अनेक नागा लोक, नागा बंडखोरांनीं कापून काढले. त्यानंतर खेडोखेडीं विरोधकांचीं आत्मरक्षक दलें उभीं केलीं गेलीं. भारत सरकार त्यांना त्यांच्या रक्षणाकरितां व बंडखोरांच्या प्रतिकाराकरितां शस्त्रास्त्रें देऊं लागलें. नागा बंडखोर त्यामुळें दूरच्या भागांत व जवळच्या प्रदेशांत लुटालूट करून द्रव्य व शस्त्रास्त्रें संपादन करूं लागले. या नागा बंडखोरांचा निकाल भारत सरकारला लवकर करतां आला असता. पण त्यांनीं आपल्या सैन्याला असा सक्त हुकूम दिला होता कीं, त्या बंडाचा मोड युद्ध करून करूं नये. नागा लोक आपले बांधव आहेत. ते चुकत आहेत; पण त्यांच्यावर प्रचंड हल्ले न करतां, नागाभूमींत शांतता स्थापण्याचे प्रयत्न सैनिकांनीं करावेत. तेथील जनतेचें तुम्ही संरक्षण केलें पाहिजे. बंडखोर शांततेचा भंग करीत आहेत, ही गोष्ट जनतेला पटवून तुम्ही जनतेचा विश्वास संपादन करावा. आपण हिंदुस्थानचेच प्रजाजन आहोंत, ही भावना त्यांच्यांत निर्माण करावी.

लष्करानें आपलें काम मारण्याचें नसून मतपरिवर्तनाचें आहे व त्याकरितां आत्मबलिदान केलें पाहिजे हा सरकारी आदेश अत्यंत कसोशीनें पाळला. पंडित जवाहरलाल नेहरूंनीं पार्लमेंटमध्यें सैनिकांच्या शिस्तीचा व आज्ञापालनाचा गौरव केला. भारताच्या स्वातंत्र्यकालीन इतिहासांत हें एक अभिनव पर्व सुरू झालें. सैन्य हें मारण्याकरितां असतें हा पारंपारिक समज नागाभूमींत तरी दूर झाला. भारतीय सैनिक हे मानवतेचे, करुणेचे, दयेचे व शांततेचे उपासक आहेत व ते आपलें रक्षण करण्यास आले आहेत असें जनतेला वाटूं लागलें ही सामान्य गोष्ट नव्हती. लष्कर म्हटलें कीं जनता घाबरते, धसका घेते, पळून जाते, वगैरे कांहीं तेथें दिसलें नाहीं. भारतीय सैनिक शोभेकरितां जवळ शस्त्रास्त्रें बाळगतात, त्यांना त्या शस्त्रांचा उपयोग करण्यास हुकूम नाहीं असें बंडखोरांना व जनतेलाहि वाटूं लागलें. त्याच वेळीं बंड मोडण्याकरितां भारतीय सैन्याला मोकळीक दिली असती, तर नागांचा प्रश्न तेव्हांच मिटला असता. पण भारत सरकार मानवतेला आवाहन करीत होतें व स्वतः कारुण्यानें वागत होतें. भारतीय सैनिकांनीं आपलें हें काम मनापासून केलें. त्यांनीं रस्ते, पूल बांधले व जें काम करावयास कंत्राटदार तयार होत नव्हते तें काम लष्करी इंजिनिअर्सनीं केलें.

पण एवढ्यानें काय होतें ? लष्करी लोकांनीं दुष्काळी भागांतील जनतेला आपल्या घासांतला घास देऊन जिवंत ठेवलें. लष्करी अधिकाऱ्यांच्या बायकांनीं नागा मुलांना आंघोळी घालाव्यात, त्यांना स्वच्छ करावें, त्यांना खाऊंपिऊं घालावें अशी भूतदयेचीं कामें केलीं. सैनिकांनीं ग्रामसफाई केली, लोकांना औषधें दिलीं, त्यांच्या दुखण्याकडे लक्ष पुरविलें, शाळा काढल्या, हिंदीचें शिक्षण दिलें, शारीरिक व्यायाम मुलांकडून करवुन घेतले, त्यांच्या नाचगाण्यांत ते सामील झाले, त्यांचे सणवार पाळले, त्यांच्या देवदेवतांची पूजाअर्चा केली, त्यांच्यांत बसून त्यांचें अन्न सेवन केलें. कांहीं लष्करी अधिकाऱ्यांनीं नागा संस्कृतीचा अभ्यास करून पुस्तकें लिहिलीं. मारण्याचें काम त्यांनीं सोडून दिलें व जगवण्याचें काम त्यांनीं हातीं घेतलें.

अहिंसेच्या प्रक्रियेंत या साऱ्या गोष्टी असतात. पण जवळ शस्त्र असून शस्त्राचा वापर करावयाचा नाहीं; सेवा करायची व शत्रूचीं अंतःकरणें प्रेमानें जिंकायचीं असें खडतर व्रत ह्या सैनिकांनीं केलें. आधुनिक इतिहासांत असें

उदाहरण दिसत नाहीं. त्याचा कांहीं नागांवर परिणाम झाला यांत वाद नाहीं; पण बंडखोर नागांनीं हिंदुस्थानची ही दुर्बळता आहे असा ग्रह करून आपल्या चळवळी अधिकाधिक वाढवल्या.

## ख्रिस्ती धर्माचा फैलाव

वर्षांमागून वर्षें लोटत होतीं. हिंदुस्थान आपल्याच गुलामीच्या चिंतेंत व्यग्र होता. ब्रिटिश राज्य सुरळीतपणें चालू होतें. भारतीय पुढारी स्वतंत्र्याकरतां किंवा स्वराज्याकरितां सनदशीर प्रयत्न करीत होते. पण भारताच्या सीमाहद्दींत कोणते लोक आहेत, ते कसे जगत आहेत, त्यांची संस्कृति, त्यांचे आचारविचार, त्यांचा धर्म वगैरेंचा पूसतपास त्यांनीं केला नाहीं. इंग्रजी राज्य आलें, व त्या त्या राज्याबरोबर त्याचे धर्मप्रचारकहि आले. राज्यकर्ते जर परके असतील व त्यांचे धर्मप्रचारक हेहि परके असतील, तर धर्मपरिवर्तनाचें काम जोरानें होतें. स्वतंत्र भारतांत धर्मांतर होत नाहीं असें नाहीं; पण त्याला सरकारी पाठिंबा मिळत नाहीं. ब्रिटिश राजवटींत तर धर्मांतराला पूर्ण मोकळीकच होती याचा अर्थ त्या राजवटींत जर धर्मांतर सक्तीनें झालें तर त्याची दाद फिर्याद कोणी घेत नसे.

१८४० मध्यें रे. माईल्स ब्रॉन्सन नांवांचा एक धर्मोपदेशक नागाभूमींत आपलें धर्मदीक्षेचें काय स्वस्थपणें करूं लागला. त्यानें नागाकरतां शाळा, दवाखाने काढले व त्यांना चहाच्या मळ्यांतील कामहि शिकवलें. लोकांची त्याच्यावर श्रद्धा बसूं लागली. तो त्यांना उपकारकर्ता वाटला. १८७३ मध्यें रे. क्लॉर्क नांवाचा दुसरा मिशनरी तेथें गेला. १८९४ मध्यें अमेरिकन मिशनरी तेथें गेले. ते नागांना शिकवूं लागले व कारुण्यानें वागवूं लागले. नागांना मुळांतच धर्मभावना नव्हत्या; पण ज्या पारंपारिक भावना होत्या, त्यावर हे मिशनरी हल्ले चढवूं लागले. त्याचा परिणाम धर्मांतराच्या बाबतींत प्रतिकूल होऊं लागला. १८९१ मध्यें २११, १९०१ मध्यें ५७९, इतकीं धर्मांतरें झालीं. नागाभूमीची लोकसंख्या जवळ जवळ साडेतीन लाख. त्यांत खिश्चन्स किती आहेत याचा आंकडा उपलब्ध नाहीं. पण नागभूमि ही खिश्चनांचीच भूमि आहे, जागोजागीं चर्चेस आहेत, धर्मप्रचारक आहेत व त्यांचें कामहि सुरूं आहे. उंगमा येथील एका चर्चमध्यें डे. कमिशनरसाहेब प्रवचनाचें काम एका करीत.

नागा बॅप्टिस्ट ख्रिश्चन कनव्हेन्शन नांवाची एक नागांची संस्था आहे. त्या संस्थेंत १४ जमाती समाविष्ट झाल्या असून, ती संस्था मुख्य मुख्य जमातींची प्रातिनिधिक मानली जाते. प्रत्येक खेड्यांत चर्च आहे व त्या चर्चचा पॅस्टर तेथें रहातो. त्याचा खर्च गांवकरी करतात. त्याला घरहि बांधून देतात, अन्न मोफत देतात व खर्चाकरतां ५० रुपयेपर्यंत मदत देतात. त्या कनव्हेन्शनच्या ६३२ चर्चेस आहेत व सभासद संख्या ७३,५०० आहे. त्याशिवाय तेथें इतर ख्रिश्चन मिशन्स असतील व त्यांचीहि कांहीं सभासदसंख्या असेल. नागालँडमध्यें बहुसंख्य लोक ख्रिश्चन धर्माचे आहेत.

भारत सरकार धर्मांतराच्या बाबतींत पूर्णपणें तटस्थ आहे. सरकारी इमारतींत धर्मांतराची चळवळ करूं नये एवढाच त्यांनीं निर्बंध घालून दिला आहे. उरल्या-सुरल्या नागांनीं धर्मांतर करूं नये असें सांगणारे तेथें कोण आहेत ? तेव्हां तेहि आज ना उद्यां ख्रिश्चन होतील यांत शंका नाहीं.

ज्या वेळीं नागाभूमींत बंडाला सुरुवात झाली, त्या वेळीं चर्चेसची सहानुभूति 'बंडवाल्यांकडेच होती. कित्येक खेड्यांत बंडाचे पुढारी चर्चेसचे पॅस्टर्सच असत; पण पुढें त्यांच्यावर निर्बंध घालण्यांत आले. ते कितपत पाळले गेले याची शंकाच आहे.

नागा बंडखोरांनीं जेव्हां आपली लष्करी संघटना केली, तेव्हां प्रत्येक कंपनींत एक पॅस्टर असला पाहिजे असा त्यांनीं नियम केला. नागा बंडखोरांचीं पथकें जेव्हां जेव्हां संचलनाला बाहेर पडत, तेव्हां तेव्हां ख्रिश्चन धर्मविषयक स्फूर्ति-गानें ते गात. ' नागांच्या प्रत्येक चळवळींत भगवंताचें अधिष्ठान पाहिजे, आणि म्हणून युद्धाच्या प्रत्येक बाबतींत जितके पॅस्टर्स नेमतां येतील तितके नेमा ' असा त्यांचा सक्त हुकूम असे. नागाभूमि हें आशिया खंडांतील पहिलें ख्रिश्चन राष्ट्र असल्यामुळें ख्रिश्चनांनीं ' हिंदु सरकार ' बरोबर निकरानें लढलें पाहिजे, असें त्यांना सांगण्यांत येतें. नागालँड ही ख्रिश्चनांकरितां आहे, असे फलक चहूंकडे लावले आहेत व तशा घोषणाहि केल्या जातात.

सारेच ख्रिश्चन मिशनरी बंडखोरांच्या बाजूला होते असें नाहीं. ते म्हणत, भारतीय राज्यघटनेंत धर्मांतराला परवानगी असल्यामुळें स्वतंत्र राज्यच काय करावयाचें ? पण तो वर्ग अल्पसंख्य असावा. त्या बंडांत कांहीं चर्चेस चुकून नष्ट झाल्या; पण त्या बांधून देण्याचा खर्च आमच्या सरकारनें केला ! ही धर्म-

विषयक सहनशीलता फक्त भारत सरकारच दाखवूं शकलें. इतर राष्ट्रांत अशा गोष्टी घडल्या नसत्या.

१९४७ सालीं परदेशीय मिशनचे सहा प्रमुख उपदेशक नागाहिल्स जिल्ह्यांत होते. पण आतां कोहिमा येथें फक्त एकच जण उरला आहे व तो इटालिअन आहे. परके मिशनरी गेले असले तरी त्यांनीं आपली प्रजा तेथें पुष्कळच ठेवली आहे व ती प्रजा मूळच्या मिशनऱ्यांपेक्षां अधिक धुमाकूळ घालीत आहे. नागा खिश्चन्स म्हणतात, आम्हीच परक्या मिशनऱ्यांपेक्षां अधिक चांगला व परिणामकारक प्रचार करूं शकतों. परक्यांची आम्हाला जरुरी नाहीं. खिश्चन धर्मप्रचाराला व संरक्षणाला तेथें जेवढी मोकळीक आहे, तेवढी जगांतल्या अन्य कोणत्याहि विधर्मी देशांत नसेल. त्यामुळें बाहेर देशांतील धर्मप्रचारक हिंदुस्थानची प्रशंसा करतात. हिंदुस्थान सरकारनें आणखी एक मोठी गोष्ट तेथें केली आहे. नागाभूमींत जवळ जवळ २००० सरकारी नोकर आहेत. ते बहुतेक नागा खिश्चन्स आहेत. नागा टयुएंगसँग राज्यांत तीन डेप्युटी कमिशनर्स होते. त्यांतील दोघे खिश्चन्स होते व एक पारशी होता.

हिंदुस्थान सरकार त्या राज्यांत सारे खिश्चन्स नेमण्याची चूक करीत आहे. नागांना जर संरक्षण द्यावयाचें असेल तर तेथें मिश्र धर्मांचे अधिकारी नेमावयास पाहिजेत. नागांना सारें रान मोकळें सोडल्यानंतर त्यांनीं भारताच्या संघराज्यांत कशाकरितां यावें, त्यांनीं तडजोडीला कां तयार व्हावें हें समजत नाहीं. उच्च, उदार हेतू त्यांत आहेत यांत दुमत नाहीं; पण एक भाग भारताच्या कक्षेंतून जात असतां, त्याला कोठेंच पायबंद घातला जाऊं नये हें विचित्र व गैरमुत्सद्देगिरीचें वाटतें.

## बंडाला कलाटणी

बंडांचा महायज्ञ हा दीर्घकाळ टिकत नाहीं. बंड हें अल्पावधींत यशस्वी झालें तर त्यामुळें राज्यक्रांति होते, न झालें तर लोक कंटाळतात व निराळा उपदेश करूं लागतात. वर्षानुवर्षें बंडें चालल्याचीं उदाहरणें क्वचित्. नागालँडमधील बंडखोरांना यश मिळत नाहीं असें पाहिल्यावर त्यांचेच कांहीं धाडसी लोक पुढें आले व हे अत्याचार थांबवा, दैनंदिन जीवनाला कांहीं स्थैर्य येऊं द्या, आम्हांला जगूं द्या व तुम्हीहि जगा असें म्हणूं लागले.

१९५५ सालीं परस्परांतील वैरें वाढत चाललीं आणि एका पक्षानें हे चाललेले प्रकार थांबवावेत म्हणून खोनोमा येथें एक सभा बोलावली. नागा नॅशनल कौन्सिलचे बऱ्याचजणांनीं राजीनामेहि दिले. पण बंडाची आग जरी संपली होती, तरी धग संपली नव्हती. ही सभा बोलावणारा जो नागा पुढारी होता, त्याच्या घराला बंडखोरांनीं वेढा घातला, त्याला बाहेर काढला, जंगलांत सोडला व तेथें त्याचे हाल हाल करून प्राण घेतले.

पण त्यामुळें तडजोडवाल्यांचें धैर्य खचलें नाहीं. तें धैर्य अधिकच वाढलें. ते जीवावर उदार होऊं लागले. भारत सरकारहि तडजोडवाल्यांना शक्य तें सहाय्य करूं लागलें. १९५६ च्या ऑक्टोबर महिन्यांत श्री. नेहरू हे नागांच्या शिष्टमंडळाला दिल्ली व शिलॉंग येथें भेटले व नेहरूंनीं नागांना जास्तींत जास्त स्वायत्तता देण्याचें कबूल केलें, पण एका अटीवर. नागांनीं अत्याचारी मार्ग सोडून दिला पाहिजे.

हा तडजोडवादी वर्ग अत्याचारी मार्ग कसे बंद होतील याच्या तयारीला लागला. त्यांनीं १९५६ सालीं एक शांतता संघटन संस्था काढली व त्यांनीं लोकांना सशस्त्र प्रतिकाराचा मार्ग सोडून देण्यास विनंति केली. १९५७ सालीं चर्च व चर्चचे उपदेशक प्रथमच अत्याचाराचा निषेध करण्यास पुढें आले. त्यांनीं आपल्या सर्व धर्मोपदेशकांना शांततेकरितां प्रयत्न करण्याचा आदेश दिला.

१९५७ च्या उन्हाळ्यांत नागांनीं सर्व नागा जमातींची परिषद कोहिमा येथें बोलावली. ती परिषद २२ ते २६ ऑगस्ट १९५७ च्या दरम्यान भरली. त्या परिषदेला १७६५ प्रतिनिधी व २००० निमंत्रित हजर होते. या परिषदेला बंडखोरांनीं चोरून पाठिंबा दिला होता. ते स्वतः मात्र त्या परिषदेला हजर राहिले नाहींत. परिषद यशस्वी झाली. त्या परिषदेनें पहिला ठराव जो केला, तो वाटाघाटीनें नागांचा प्रश्न सोडवावा असा केला. दुसऱ्या एका ठरावांत असें म्हटलें होतें कीं, नागांचा प्रश्न अखेरचा सुटण्यापूर्वीं नागाहिल्स जिल्हा व ट्युएनसँग विभाग यांचा एकच शासक विभाग बनवावा व तो परराष्ट्र खात्याच्या मंत्रिमंडळाच्या अखत्यारींत ठेवावा. ती परिषद व त्या परिषदेंतील ठराव मवाळ नागांचे आहेत असें भूमिगत नागा म्हणत होते. त्यांना पाहिजे होतें संपूर्ण स्वातंत्र्य. त्यांची भूक असल्या भिकार सुधारणा मागितल्यानें कशी भागणार ? मवाळ- जहाल नागांना म्हणत, आम्ही ज्या सुधारणा मागितल्या

आहेत, त्या तात्पुरत्या आहेत. तुम्ही जहाल नागा बाहेर या व राजकीय हक्कांचें शेवटचें स्वरूप ठरवून घ्या. मवाळ नागांच्या ह्या परिषदेचें महत्त्व फक्त एकच होतें. त्यांनीं बंडाला उघड उघड विरोध केला.

त्या परिषदेंतील ठरावाप्रमाणें भारत सरकारनें १ डिसेंबर १९५७ रोजीं नागाहिल्स टयुएंगसँग विभाग निर्माण केला. त्या विभागाचे तीन जिल्हे केले. १ कोहिमा, २ मोकोकचुंग व ३ टयुएंगसँग. भारत सरकारनें त्याचबरोबर चांगलें वातावरण निर्माण व्हावें म्हणून गुन्हेगार कैदी सोडले व खटले काढून घेतले.

या सरकारी वृत्तीचा बऱ्याच भूमिगत नागांवर इष्ट परिणाम झाला. सुमारें ३००० नागा शरण आले; जे नागा भूमिगत होते, त्यांतील ३००० प्रगट झाले आणि ४००० नागांना मुक्त करण्यांत आलें.

या धोरणामुळें नागांत चांगली प्रतिक्रिया झाली. अत्याचारांचा धिक्कार होऊं लागला; शाळा उघडूं लागल्या, सरकारबरोबर विकासयोजनांत लोक सहकाराकरितां पुढें येऊं लागले; प्रजासत्ताक दिनासारखे राष्ट्रीय दिवस साजरे होऊं लागले. पण भूमिगत नागा ह्या वरवरच्या शांततेकडे तुच्छतेनेंच पहात होते. त्यांना त्यांत समाधान नव्हतें.

त्या परिस्थितींत मे १९५८ मध्यें मोकोकचुंग जिल्हयांत उंगमा येथें नागांनीं दुसरी परिषद भरवली. उंगमा हें बंडवाल्यांचें मुख्य ठाणें होतें. तेथूनच त्यांनीं बंडाचें शिंग फुंकलें होतें. तेव्हां तेथें परिषद भरविणें हा धाडशी प्रयत्न होता, बंडवाल्यांनीं असें जाहीर केलें कीं, जर तेथें परिषद भरवूं दिली तर प्रत्येक खेड्याला ५०,०००रु. दंड द्यावा लागेल. पण त्या परिषदेला बंडखोरांपैकींच दीडदोनशें लोक हजर राहिले. त्या परिषदेंत नागा बंडवाल्यांना वश करण्याचा प्रयत्न सफल झाला नाहीं. त्या परिषदेनें सुधारणा तयार करण्याकरितां जो मसुदा तयार करावयाचा त्याकरितां एक कमिटी नेमली. त्या कमिटीनें एक सोळा कलमी घटना बनवली. ती घटना बनविण्यांत कांहीं बंडखोर नागा पुढारी सामील झाले होते. हिंदी संघाच्या अंतर्गत एक निराळें नागांचें राज्य स्थापन करावें अशी त्या घटनेंत मागणी केली होती. ऑक्टोबर १९५९ मध्यें नागांची तिसरी परिषद मोकोकचुंगला भरली. त्या परिषदेला हजारोंच्या संख्येनें नागा लोक हजर राहिले. त्या लहानशा गांवीं इतक्या लोकांचा समावेश करणें कठीण गेलें.

प्रत्येक घर पाहुण्यांनीं भरून गेलें होतें. नागा लोकांत एक निराळें चैतन्य व निराळी आशा दिसूं लागली. त्यांना स्वातंत्र्य जरी नाहीं तरी स्वतंत्र राज्य मिळावयाचें होतें. भारत सरकार त्यांना वाटेल तें द्यावयास तयार होतें; फक्त त्यांनीं भारत संघराज्यांत रहावें म्हणजे झालें. नागा राज्यांत इतर १५ राज्यां-प्रमाणेंच कायदेमंडळ, आमदार, मुख्य मंत्री, गव्हर्नर वगैरे सर्व येणार होते. याशिवाय जिल्हा, रेंज व ट्रायबल मंडळेंहि निर्माण होणार होतीं. त्यांचे जुने कायदे, जुने रीतीरिवाज व जुनी संस्कृति कायम राहून ते नव्या राज्यांत प्रवेश करीत होते.

नवें राज्य सुरळीतपणें स्थापन व्हावें, तें चालावें व कार्यक्षम व्हावें म्हणून राजबंदींची सुटका जशी मागण्यांत आली, तशी भूमिगत नागांना बंड आवरा अशी विनंतीहि करण्यांत आली. सरकारबरोबर सहकार्य करा, आपला विकास करा व स्वतःचें राज्य चालवा असें नागा जनतेला आवाहन करण्यांत आलें. परिषद यशस्वी झाली. नागांचे पुढारी एक शिष्टमंडळ घेऊन एप्रिल १९६० मध्यें आसामच्या गव्हर्नरला भेटण्याकरितां शिलाँगला गेलें. तेथें घटनेंत कांहीं कमीजास्त फेरफार करून ते दिल्लीला जाणार होते. पण पंतप्रधान नेहरू त्यावेळीं महत्त्वाच्या गुंतागुंतींत गुरफटले असल्यामुळें त्यांना मेमध्यें भेटूं शकले नाहींत. पण जुलै १९६० मध्यें नागांचें शिष्टमंडळ नेहरूंना भेटलें. नेहरूंनीं नागा राज्य स्थापन करण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें पुढें तें स्थापन झालें.

वास्तविकपणें नागांच्या सर्व न्याय्य मागण्या पुरेपूर मान्य केल्यानंतर नागांचा प्रश्न तेथेंच समाप्त व्हावयास पाहिजे होता. पण १६ वें नागा राज्य स्थापूनहि तेथें अद्याप शांतता नाहीं. फिझोसारखे बंडखोरांचे पुढारी, ख्रिस्ती मिशनऱ्यां-मार्फत तेथें त्रास देत राहिले. बंडखोरांनीं एक भूमिगत पार्लमेंटहि स्थापन केलें आहे. त्या पार्लमेंटचे मंत्री ( ? ) नागालँड हें स्वतंत्र राष्ट्र आहे याला भारताची मान्यता मिळवूं पहात आहेत.

## नागांच्या बंडाचीं कारणें

सामान्यतः जे बंडें करतात, अत्याचार करतात, ते क्रूर रानटी असतात व त्यांचा निष्ठुरपणें नायनाट केला पाहिजे असें म्हणण्यांत येतें. बंड करणारे निष्कारण जीवावर उदार होत नाहींत. ते नव्यानें आलेल्या किंवा प्रस्थापित

झालेल्या सत्तेविरुद्ध उठतात, तेव्हां त्यांनाहि कोठेंवरी त्या सत्तेचा आघात जाणवत असतो. तेव्हां बंडखोरांकडे ते गुन्हेगार आहेत, अराजक माजवणारे आहेत या दृष्टीनें पाहूं नये. साम्राज्यसत्तेचे व बादशाही सत्तेचे पुरस्कर्ते ज्यांना जिंकावयाचे ते दुर्बळ आहेत का नाहींत एवढेंच पाहत असत. मोठा मासा लहान माशांना गिळतो, तसा त्यांचा न्याय होता. म्हणूनच राजसत्ता संपल्या व साम्राज्यसत्ता कोलमडल्या. आधुनिक काळ निराळा आहे. हिटलरची फॅसिस्ट सत्ता, रशियाची साम्यवादी सत्ता व इंग्लंडसारख्या देशांची साम्राज्यशाही सत्ता ह्या साऱ्या गतगोष्टी झाल्या आहेत. हा सर्व बदल लक्षांत घेऊनच ज्यांना राज्यें चालवावयाचीं असतील त्यांनीं चालवावींत. जुनी वृत्ति, धोरणें व तत्त्वें आज जुन्या जमान्यांत जमा झालीं आहेत.

नागा लोक बंडाला जे प्रवृत्त झाले त्याला कांहीं कारणें असलीं पाहिजेत. ब्रिटिश राज्य येथें आल्यावर त्यांना प्रतिकार झाला नाहीं असें नाहीं. अनेक ठिकाणीं त्यांच्या विरुद्ध उठाव झाले. त्यांनीं ते उठाव आपल्या लष्करी शक्तीनें मोडून काढले. आदिवासी जमातींनीं सुद्धां मुकाट्यानें ब्रिटिश राज्य स्वीकारलें नाहीं. अगदीं डोंगरमाथ्यावर, दाट जंगलांत, दऱ्याखोऱ्यांत आदिवासींनीं लहान-मोठीं बंडें केलीं. त्याला अनेक कारणें होतीं. कोणालाहि आपलें स्वातंत्र्य जावयास नको असतें. त्या स्वातंत्र्यांत तो आपल्या जीवनाची कांहीं एक पद्धत घालून बसलेला असतो. त्याचा धर्म, त्याची जमीन, त्याचे कायदे, त्याच्या रीतिभाती, त्याचा जीवनक्रम ह्याची व्यवस्थितपणें घडी बसलेली असते. नवी राजवट आली म्हणजे ती त्यांत बदल करणारच हें त्यांना ठाऊक असतें. १८५७ सालच्या शिपायांच्या बंडाला ' गाईची व डुकराची चरबी ' कारणीभूत झाली. आपण त्या बंडाचीं गाणीं व कथानकें मोठ्या स्फूर्तीनें वर्णन करतों. नागांच्या बंडांना अशींच कांहीं कारणें झालीं. भारतसंघांत यावयाची त्यांची तयारी नाहीं. कारण त्या संघांत गेल्यावर आपण आपल्या सर्वस्वाला मुकूं ही त्यांची भीति. म्हणून ते म्हणतात, तुमचें स्वातंत्र्य तुम्हाला लखलाभ होवो; आमचें स्वातंत्र्य आमच्याकडे राहूं द्या. आम्ही अडाणी, अशिक्षित राहूं, पण त्यांत आमचें समाधान आहे. आम्ही तुमच्या स्वातंत्र्याला धोका पोहोंचेल असें कांहींहि करणार नाहीं. आपण शेजारी शेजारी मित्र म्हणून शांततेनें नांदूं, शांततामय सहजीवन हा तुमचा सिद्धांत आम्हाला तुम्ही कां नाहीं लागू करीत ?

हिंदुस्थानचें त्यावर उत्तर आहे. आम्ही नागाभूमीवर आक्रमण केलें नाहीं व ती भूमि जिंकली नाहीं. हिंदुस्थानचा तो विभाग आहे व त्या विभागाला हिंदुस्थानबरोबर सहजीवन घालवितां येईल.

१९४४ च्या जपानी स्वारीपूर्वी नागा लोक आपल्या प्राचीन परंपरेंत जीवन घालवीत होते. पण जपान्यांच्या सहवासांत त्यांच्या जीवनाला नवें स्वरूप प्राप्त झालें. त्यांची दृष्टि फाकली व नव्या जगाच्या लखलखाटानें त्यांचे डोळे दिपून गेले. दुसऱ्या महायुद्धापूर्वी, कांहीं जमाती सोडल्या तर, शाळेंत जाणें त्यांना आवडत नसे. इलाजच नाहीं म्हणून ते शिकत. पण युद्धसमाप्ती-नंतर शिक्षणाचें वेड त्यांच्या डोक्यांत इतकें शिरलें कीं, ते स्वतःच शाळा बांधूं लागले व त्यांचा खर्च सोसूं लागले. ही क्रांति सर्वच क्षेत्रांत झाली. सामाजिक, आर्थिक, राजकीय जीवनांत त्यांना बदल झाला पाहिजे असें वाटे. ते व्यापारधंद्यांत लक्ष घालूं लागले. दळणवळणाचीं साधनें वाढलीं व एकंदरींत नवें विश्व आपल्यापुढें उभें आहे असें त्यांना प्रतीत झालें. जीवनाचीं मूल्यें बदललीं व नव्या आवडीनिवडी निर्माण झाल्या. या क्रांतिकारक काळांत त्यांनीं पाश्चात्यांचें अनुकरण सोडून दिलें. पूर्वीं स्त्रिया व पुरुष पाश्चात्य पद्धतीचा पोषाख मोठ्या आवडीनें परिधान करीत. पण आतां त्यांच्या पोषाखाला राष्ट्रीय दृष्टि प्राप्त झाली आहे. पाश्चात्य संस्कृतीच्या जागीं नागा संस्कृति अधिष्ठित झाली. राष्ट्रीय नृत्य व राष्ट्रीय गाणीं यांना अभूतपूर्व स्थान लाभलें. नागा माणूस हा अशा प्रकारें नवीं नवीं क्षितिजें धुंडूं लागला. त्यांच्यांत राष्ट्रीयत्व संचरलें.

नागा लोक स्वभावतः हे स्वतंत्र व अनिर्बंध जीवनाचे भोक्ते आहेत. ते कोणाच्याहि तंत्रानें चालणारे नाहींत. त्यांच्यावर कोणी टीका केली तर ती त्यांना सहन होत नाहीं. ह्या त्यांच्या स्वतंत्र वृत्तीकरितां व असहिष्णुतेकरितां त्यांनीं गांवेंचीं गांवें बेचिराख केलीं, अनेकजणांचे बळी घेतले आणि आपलेंहि प्राणार्पण केलें. किरातांचें रक्त त्यांच्यांत वहात आहे. जुन्या वृत्तींत बदल घडवून आणणारे त्यांच्यांत शिरले नसतील असें नाहीं; पण त्यांच्या जीवनांत व संस्कृतींत ते बदल करूं शकले नाहींत. हिंदुस्थानांत काँग्रेस स्थापन झाली; पण नागाभूमींत काँग्रेसचें नांवहि ठाऊक नसेल. गांधींनीं असहकारिता, सत्याग्रह वगैरे चळवळी केल्या; पण नागांना त्यांचा वारा लागला नाहीं.

भारत एक आहे म्हणविणाऱ्या आम्ही लोकांनीं त्यांच्या जीवनांत कधीं प्रवेश केला नाहीं. धर्म, राजकारण, अर्थकारण, समाजकारण वगैरे बाबतींत त्यांची आम्ही दखल घेतली नाहीं.

नागा लोक तीन सिद्धान्त मांडतात : (१) नागा हे हिंदी नाहींत व ते हिंदी होऊं इच्छित नाहींत. (२) नागाभूमि ही हिंदुस्थानचा भाग कधींहि नव्हती व ती आतां तशी होतां कामा नये. (३) नागाभूमि ब्रिटिशांनीं जिंकली व ते निघून गेल्यावर ती भूमि पूर्वीप्रमाणेंच स्वतंत्र झाली पाहिजे. नागा लोक आपल्या स्वातंत्र्याचें रक्षण प्राणार्पण करून करणार आहेत. नागांमधील ज्वलज्जहाल पुढाऱ्यांची ही भूमिका आहे.

ती त्यांची भूमिका जगाला व आपल्या लोकांना पटविण्याकरितां नागा लोकांनीं जें प्रसिद्धीचें तंत्र अवलंबिलें आहे, तें हिंदुस्थानच्या मानानें कितीतरी प्रभावी आहे. हिंदुस्थान प्रचाराच्या बाबतींत जगांतल्या राष्ट्रांत शेवटून पहिला किंवा दुसरा क्रमांक पटकावील ! हिंदुस्थानला प्रचारांत नागांनीं केव्हांच मागें टाकलें आहे. त्यांचा प्रचार हा जिवंत असतो, मनाला व भावनांना स्पर्श करणारा असतो. हिंदुस्थानच्या प्रचारांत शुष्क आंकडे व मृत सिद्धान्त असतात. नागा लोक प्रचार करतांना खऱ्याखोट्याचा विधिनिषेध बाळगीत नाहींत. त्यांच्या प्रचाराचा एक नमुना पहाण्यासारखा आहे.

'खरें म्हणजे आम्ही चमत्कारिक लोक आहोंत. आम्ही सर्व समान दर्जाचे आहोंत. स्त्री व पुरुषांचा सामाजिक दर्जा सारखा आहे. आमच्यांत जातिभेद नाहींत. आमच्यांत उच्चनीच भाव नाहींत. आमच्यांत जातीय भावना नाहींत व धर्मभेद नाहींत. अल्पसंख्याकांचा प्रश्नच आमच्यांत नाहीं. आम्हांला बहुसंख्य लोकांची लोकशाही सत्ता मान्य नाहीं. आम्हांला लोकांचें राज्य हवें आहे. जें सरकार राज्यच करीत नाहीं अशा सरकारकडून आम्ही स्वतः-वरच राज्य चालवितों.

'आमच्या खेड्यांतील जीवनांत कुटुंब ही जिवंत संस्था असते. राष्ट्रीय राज्यकारभारांत तो एक जागृत घटक आहे. प्रत्येक कुटुंबाला स्वतःबद्दल अभिमान वाटतो. कोणत्याहि कुटुंबाची हेळसांड अन्य कुटुंबियांकडून होत नाहीं. स्वतःच्या जमिनीवर आम्ही स्वतःचीं घरें बांधतों. त्यामुळें कोणतेंहि कुटुंब कर देत नाहीं. जंगलें, रानें, नद्या वगैरे लोकांच्या आहेत. तेथून आम्ही

जरुरीच्या वस्तू आणतों. त्याकरितां कर देत नाहीं. आम्हांला जरूर असेल तेवढी जमीन आम्ही नांगरतों आणि कोणीहि आमच्या त्या हक्काबद्दल प्रश्न विचारीत नाहीं.

'आम्हांला जरुरीपेक्षां जास्त अन्न खायला आहे व जरुरीपेक्षां जास्त दारू प्यायला आहे. परमेश्वरानें खरोखर आमच्यावर कृपा केली आहे. आमच्यांत कोणी भिकारी नाहीं.

'आमच्यांत जमीनदार नाहीं; जमीन महसूल नाहीं. प्रत्येक कुटुंब एखाद्या राजाप्रमाणें स्वतंत्र आहे. आमच्यांत तुरुंग नाहींत. आम्ही कोणाला पकडीत नाहीं व कैद करून ठेवीत नाहीं. जीवन व मृत्यूंत आमचा सत्ताधीश परमेश्वर आहे. आमच्यांत क्वचित् खून होतात.

'आम्ही कोणाला भीत नाहीं. आम्ही निरोगी आहोंत. भय असलें म्हणजे माणसाची प्रकृति ढांसळते. आमच्यांत पोलीस नाहींत. सी. आय. डी. नाहींत. कितीतरी शांततामय जीवन आमचें आहे! आम्ही घरांना कुलपें लावीत नाहीं. आमचीं धान्याचीं कोठारें गांवाबाहेर असतात. त्यांवर राखणदार नसतो. कारण कोणालाहि धान्य चोरण्याची जरुरच नसते. आम्ही इच्छेनुरूप प्रवास करतों. आणि आम्ही जेथें जातों, तेथें आमचेंच घर असतें.

'आम्ही मोकळेपणानें बोलतों, मोकळेपणानें रहातों व लढतोंहि मोकळे-पणानें. जर मला मृत्यूनंतर कोणत्या देशांत जन्म मिळणार असला तर तो नागाभूमींत मिळावा; पुनःपुनः मी तेथेंच जन्माला यावें.'

रानावनांतील, दऱ्याडोंगरांतील, स्वैर, विमुक्त नैसर्गिक जीवनाची ही नागांची ओढ किती विलोभनीय वाटते. त्यांत एकच उणीव आहे. वेदोपनिषद्–काला-प्रमाणें जर हे नागा आध्यात्मिक चिंतनांत आयुष्य घालविते, तर भारताच्या प्राचीन संस्कृतीचा तो जिवंत आदर्श आहे असें दाखवतां आलें असतें.

नागा लोकांना भारतीय राज्याबद्दल कां तिटकारा आहे हेंहि ते सांगत असतात. ते म्हणतात, तुम्ही जर सपाटीवर गेलांत तर तेथें सर्व वस्तूंवर कर द्यावे लागतात. पाण्यावर कर, चालण्यावर कर, जमिनीवर कर, कापडावर कर, जंगलावर कर, मासळींवर कर, गुरांढोरांवर कर, अशा अनेक करांनीं भारतीय जीवन करकचून बांधलें गेलें आहे. आपलें स्वतंत्र जीवन सोडून जर आपण भारतांत गेलों तर आपलें सारें सुख, समाधान, शांति, आनंद नष्ट होईल

असें त्यांना वाटतें.

मोकोकचुंगसारख्या भागांत ख्रिस्ती चर्चेसना ते सांगत, तुम्ही भारतांत गेलांत, तर तेथील हिंदु तुम्हांला हिंदु करतील व तुमचा धर्म बुडवतील. ज्या ख्रिस्ती धर्मोपदेशकांना व अनुयायांना भारताच्या राज्यघटनेची माहिती नव्हती, ते आपल्या ख्रिस्ती धर्माच्या रक्षणाकरितां बंडखोरांना सामील झाले. नागा पुढाऱ्यांनीं आपल्या प्रचाराचें शस्त्र भारताविरुद्ध इतक्या कुशलतेनें चालविलें आहे कीं, त्याबद्दल त्यांचें कौतुक केल्याशिवाय रहावत नाहीं.

तुम्ही भारतांत गेलांत तर तुम्हाला मांस खातां येणार नाहीं, दारू पितां येणार नाहीं, तुमच्या जमिनी काढून घेतील, तुम्हांला गुलाम करतील वगैरे भयानक गोष्टी त्यांना सांगत. १९५३ सालीं प्रसिद्ध केलेल्या एका चोपड्यांत असें म्हटलें आहे कीं, भारतांतून जें सशस्त्र सैन्य येत आहे, तें नागा स्त्रियांवर बलात्कार करण्याकरितां येत आहे. पण शूर नागा म्हणतात, असे बलात्कार करणारे सैनिक आले तर त्यांचा समाचार कसा घ्यावा हें आम्हांला समजतें. नागा प्रचारकांकडून जो हा प्रचार चालू आहे, त्यावर साऱ्याजणांचा विश्वास बसत नाहीं. कारण त्यांना खरी परिस्थिति माहीत असते. ज्या वेळीं गोरे ख्रिश्चन मिशनरी त्यांच्यांत गेले, तेव्हां त्यांनीं त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक व पारंपारिक जीवनांत काय कमी ढवळाढवळ केली ? तेच ख्रिस्ती मिशनरी व त्यांचे हस्तक नागांचें प्रचारतंत्र मोठ्या शिताफीनें हाताळीत आहेत.

भारताच्या राज्यघटनेंत जमातींना किती स्वातंत्र्य व किती हक्क दिले आहेत हें लोकांना कोण सांगतो ? त्यामुळें भीति संशय वाढतात व अस्वस्थता फैलावते. भारतीय प्रचारांत निदान जें आहे तें तरी त्यांच्या कानापर्यंत पोहोंचवलें पाहिजे.

## भारताची बाजू

जर नागा लोक भारतांत रहावयास इतके विरोधी आहेत, तर त्यांना भारत स्वतंत्र कां होऊं देत नाहीं असा प्रश्न कांहीं समंजस व्यक्ती विचारतात. नागा स्वतंत्र झाले तर हिंदुस्थानचें असें काय मोठें नुकसान होणार आहे हाहि एक महत्त्वाचा प्रश्न आहे.

हिंदुस्थानचें म्हणणें असें, आम्ही ब्रिटिशांकडून हिंदुस्थान घेतला, तेव्हां

तो नागालँडसह घेतला. आम्ही त्यांच्यावर आक्रमण करून तो घेतला नाहीं. तेव्हां तो प्रदेश आम्ही कां सोडावा ? नागालँड ही हिंदुस्थानांत निःसंशयपणें होती. नागाभूमीच काय, पण सर्व आदिवासी विभाग पूर्वापार हिंदुस्थानांत होते. हिंदुस्थानचे सर्व हक्क, सर्व सवलती, सर्व फायदे, सर्व संरक्षणें त्यांना मिळत होतीं. त्यांत कांहीं बदल झाला नाहीं व त्यांत बदल करण्याची आमची इच्छाहि नाहीं. हिंदुस्थानांतच काय, पण जगांतल्या इंग्लंड–अमेरिकेसारख्या देशांत असे मागासलेले, भिन्न वर्णाचे व संस्कृतीचे लोक रहातात. त्यांनीं कधीं ते भाग सोडून देऊन स्वतंत्र केले नाहींत. त्यांनींहि त्या लोकांना आपल्यांत यशस्वी रीत्या एकजीव केलें आहे. हिंदुस्थानला हें कां करतां येणार नाहीं ? आम्ही त्याबद्दल घाई करीत नाहीं, त्यांच्यावर जुलूमजबरदस्ती करणार नाहीं.

भारत सरकारचें असेंहि म्हणणें आहे कीं, तेथील बंडखोर वर्ग सोडला, तर बाकीची प्रजा भारतांत रहावयास तयार आहे. भारताशीं संबंध आल्या-नंतर त्यांच्या जीवनांत चांगला बदल झाला आहे व त्याबद्दल ते कृतज्ञ आहेत. सुदैव एवढेंच आहे कीं, अद्याप नागा पुढारी स्वयंनिर्णयाचें तत्त्व आम्हांला लावा असें म्हणत नाहींत. भारताचा जो भाग आहे व जो निःशंकितपणें भारतांत आहे, त्याला कोठेंहि स्वयंनिर्णय करूं देण्याचें भारताचें धोरण नाहीं.

नागा लोकांना जर स्वतंत्र राष्ट्र म्हणून मान्यता दिली तर भारत आपल्याच हातानें सरहद्दीपलीकडे असणाऱ्या राष्ट्रांना भारताचें स्वातंत्र्य धोक्यांत आणण्यास मदत करणार आहे. नेपाळ, भूतान, सिक्किम हीं भारताच्या शत्रूंचीं कारस्थानकेंद्रें बनतात याचा पुरेपूर अनुभव भारताला आहे. तेथून भारता-वर आक्रमण होणार नाहीं असें नाहीं. तेव्हां त्या स्वतंत्र राष्ट्रांत आणखी एका राष्ट्राची भर भारत घालूं इच्छित नाहीं.

भारतानें याच विचारसरणीला अनुसरून काश्मीर कां सोडूं नये, किंवा चिन्यांना लडाख वगैरे भाग कां देऊं नये ? भारत जर भित्रा, कचखाऊ व दुर्बळ देश असता, तर त्यानें असले घोर अपराध केले असते. ज्या कारणा-करितां भारतानें चीन किंवा पाकिस्तान किंवा पोर्तुगाल यांच्यापुढें मान वांकवली नाहीं, त्याच कारणाकरितां नागांच्या व नागांच्या पाठीशीं असलेल्या ख्रिस्ती लोकांच्या पुढें मान न वांकवण्याचें ठरविलें आहे.

नागाभूमीपासून भारताचा कांहींहि फायदा होणार नाहीं. भारताचे लोक तेथें वसाहतीला जात नाहींत; किंवा नोकऱ्यांकरितां तेथें त्यांना पाठविण्यांत येत नाहीं. आमचा व्यापारहि तेथें नाहीं. नागालँडमधून दरवर्षी ५ लाख रुपये उत्पन्न होतें व खर्च ४ कोटी रुपये आहे. याचा अर्थ साऱ्या नागाभूमीचा शासन-खर्च भारतालाच करावा लागत आहे. तेव्हां नागाभूमि स्वार्थी हेतूनें भारतानें आपल्याकडे ठेवली आहे असें नागाहि म्हणूं शकणार नाहींत.

नागांच्या जीवनांत हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न भारतानें कधींच केला नाहीं. त्यांचे रूढीरिवाज, त्यांची संस्कृति, त्यांचे कायदे, फायदे हे सर्व अबाधित ठेवले आहेत. उलट त्यांच्या विकासाकरितां कोट्यवधि रुपये खर्च करण्यांत येत आहेत. अशा प्रकारचा राज्यकारभार करणारें भारत हें जगांतील पहिलेंच राष्ट्र असेल. सशस्त्र सैनिकांना जें राष्ट्र सांगतें कीं, नागा बंडखोरांनीं कांहींहि केलें तरी त्यांची कत्तल करूं नका, त्यांची सेवा करा, त्यांचीं मनें वळवा, त्यांना भारताचें खरेखुरे नागरिक करा, त्या भारतापासून फुटून निघण्याची इच्छा करणें म्हणजे नागांना आत्मनाशाला प्रवृत्त करणें आहे. हें सर्व सहन करीत असतां भारत नागांना स्वतंत्र राष्ट्र होण्याशिवाय सर्व कांहीं देत आहे व आजवर दिलें आहे. सहावें परिशिष्ट, नागाहिल्स जिल्हा, नागाहिल्स व ट्युएंगसँग विभाग व शेवटीं १६ वें नागाभूमीचें राज्य हें भारतानेंच नागांना दिलें आहे हें विसरतां कामा नये.

## नागांचें राज्य

नागांचें शिष्टमंडळ जुलै १९६० मध्यें नव्या दिल्लीला पंतप्रधान नेहरूंना भेटलें. त्यांनीं १६ कलमी खर्डा त्यांना सादर केला. तीं कलमें मोकोकचुंग येथें भरलेल्या परिषदेंत मंजूर झालीं होतीं. पंतप्रधानांनीं नागांची राज्याची मागणी मान्य केल्याची घोषणा पार्लमेंटमध्यें १ ऑगस्ट १९६० रोजीं केली. त्या राज्याची घटना करावयाची होती. त्या पूर्वतयारीला कांहीं काळ लागला. १९६२ सालीं भारतीय राज्यघटनेंत १३ वी दुरुस्ती केली व १६ वें 'नागालँडचें' राज्य निर्माण केलें गेलें. डिसेंबर १९६३ च्या १ ल्या तारखेला राष्ट्रपतींनीं त्या राज्याला मंजुरी दिली. पुढें निवडणुका झाल्या व २६ जानेवारी १९६४ रोजीं नवें मंत्रिमंडळ अधिकारावर आलें. त्या मंत्रिमंडळाचे प्रमुख श्री. शिलु आवो हे

असून ६ मंत्री, १ उपमंत्री व १ पार्लमेंटरी सेक्रेटरी इतके त्यांचे सहकारी आहेत. आमदार संख्या ४१ आहे. कोहिमा ही नागालँडची राजधानी. त्यांची त्या वेळीं नमूद केलेली लोकसंख्या ३,६९,२०० व त्या राज्याचें क्षेत्रफळ ६३६६ असें आहे.

नागांची ही भारतांतर्गत राज्याची मागणी पुरी झाली; मंत्रिमंडळ स्थापन झालें; पण भूमिगत जे नागा बंडखोर होते त्यांना तें राज्य पसंत पडलें नाहीं. त्यांचेंहि भूमिगत पार्लमेंट आहे. त्या पार्लमेंटच्या बैठकीहि भरतात. ह्या स्वतंत्र नागांनीं नागालँडमध्यें १९६४ नंतर उपद्रव देण्यास सुरुवात केली. ते अत्याचार, खून वगैरे करूं लागले. त्यामुळें १६ वें राज्य सुरळीतपणें चालेना. त्यांचा पुढारी फिझो हा सध्यां इंग्लंडमध्यें आहे व तो तेथून आदेश-संदेश देत असतो. त्याला हिंदुस्थान सरकारनें येथें येण्यास बंदी केली आहे. पण इतर जे नागा बंडखोर आहेत, त्यांच्याबरोबर बोलणीं करण्याकरितां एक शांतता-मंडळ स्थापण्यांत आलें. त्यांत तीन सभासद आहेत. श्री. जयप्रकाश नारायण, रे. मायकेल स्कॉट व मि. चालिहा (आसामचे मुख्य मंत्री). या तिघांनीं आतांपर्यंत भूमिगत नागा पुढाऱ्यांच्या अनेक वेळां मुलाखती घेतल्या, चर्चा केली, पण अद्याप नागा बंडखोर स्वतंत्र राष्ट्राची मागणी सोडीत नाहींत. त्या विभागांत युद्धबंदी जारी आहे व त्याची मुदत सारखी वाढवली जात आहे. भूमिगत नागांशीं युक्तिवाद करून त्यांना मार्गावर आणावें तोंच कोणी तरी कांहींतरी खुसपट काढतो व डाव उधळून लावतो. आतां त्यांनीं फिझोचा सल्ला घेण्याकरितां त्याच्या भावाला इंग्लंडला पाठविला आहे. फिझो काय सल्ला देणार याची कल्पना लोकांना नाहीं असें नाहीं. वास्तविकपणें शांतता-मंडळानें फिझोच्या सल्ल्याची सवलत द्यावयास नको होती. रे. मायकेल स्कॉटसारख्या परक्या व्यक्तीला या शांतता-मंडळावर कां घेतलें हेंच समजत नाहीं. भारत व नागा पुढारी यांच्यामधील प्रश्नांत परक्याला स्थान कां? हे रे. स्कॉट नागा बंडखोरांचे अर्ज, मसुदे, निवेदनें तयार करीत असतात असें म्हणतात.

वरील कारणामुळें अद्याप नागालँडमध्यें सुरळीत राज्यकारभार चालू नाहीं. सामान्य लोक साशंक आहेत, भारताचे सैनिक हात जोडून बसले आहेत व भारत सरकार असहाय्य झालें आहे. राज्य चालतें आहे, विकास होत आहे,

शाळा निघत आहेत, शेती सुधारत आहे, कोट्यवधि रुपये खर्च होत आहेत; पण मनांत नाहीं विश्वास व नाहीं शांति. नागा बंडखोरांना इतर देशांतून फूस व मदत मिळत असते. ते शस्त्रास्त्रें जमवीत आहेत व आपली शक्ति वाढविण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांना बाहेरचा देश प्रत्यक्ष लष्करी मदत देऊं लागला, तर भारताला चीन, पाकिस्तानप्रमाणें आणखी एका आघाडीवर लढावें लागेल.

भारताच्या संघराज्याची ही शांततावृत्ति अभिनंदनीय असली, तरी ती धोक्याची आहे. केव्हां काय होईल हें सांगवत नाहीं. बंडखोरांचे हट्ट पुरविण्याला कांहीं मर्यादा असतात त्या मर्यादा केव्हांच संपल्या आहेत. भारतानें तारखांवर तारखा दिल्या; पण कोर्टांतल्या तारखांप्रमाणें नव्या नव्या तारखा पडत आहेत.

स्वतंत्र नागा राष्ट्राचा हा आग्रह भारत मानणार नाहींच. बंडखोरांची गय सद्भावनेनें केली जात आहे. पण नागा लोकांचें एक राष्ट्र भारतांत झालें तर तें आशिया खंडांतील ख्रिश्चन लोकांचें राष्ट्र होईल. मिशनऱ्यांनीं धर्माबरोबर राष्ट्रहि स्थापन करण्याचा पराक्रम केला असें त्यामुळें सिद्ध होईल. धर्मावर अधिष्ठित झालेली राज्यसत्ता ही पुढें अलग राहूं शकत नाहीं. ब्रिटनचें राज्य हिंदुस्थानांतून गेलें तरी नागाभूमींत तें परत स्थापन झालें असा त्याचा अर्थ होईल या गोष्टी उघड असतां व भारत सरकारचा त्याला विरोध असतां, शांतता–मंडळाचे लाड व चोचले किती काळ चालू ठेवावेत यालाहि कांहीं मर्यादा आहेत. भारत सरकारनें हें तिघांचें शांतता–मंडळ संपुष्टांत आणावें व बोलणींच करायचीं असतील तर समोरासमोर करावीं. नागा बंडखोरांना भारत सरकारच्या सचिवालयांतील अधिकारी हे खपेनासे झाले होते याची विस्मृति लोकांना अद्याप झाली नाहीं. ते नागा आपण स्वतंत्र आहोंत अशाच वृत्तीनें वागत आहेत. त्यांच्या स्वतंत्र राष्ट्राला भारतानें मान्यता द्यावी, परस्परांनीं परपस्परांशीं अनाक्रमणाचे, लष्करी सहाय्याचे करार करावेत, मित्रत्वानें वागावें वगैरे गोष्टी त्यांना हव्या आहेत. आणि मग जर नागांनाच स्वातंत्र्य द्यायचें, तर लुशाई, पिझो, खासी. जंटिया, गारो, उत्तर काचर, मिकिर टेकड्या वगैरे आदिवासी विभागांनीं काय पातकें केलीं आहेत! उद्यां मणिपूर, त्रिपुरा, अंदमान, निकोबार बेटें, लखदिव, मिनिकॉय व अमिनदिवी हींहि भारतांतून

फुटून स्वतंत्र राष्ट्राची मागणी करूं लागतील. भारताच्या स्वातंत्र्याचे तुकडे पाडण्याकरितां भारताचे पंतप्रधान व राष्ट्रपति बसले नाहींत.

नागांची कत्तल करूं नये हें मान्य केलें तरी त्यांच्याबरोबर ह्यापुढें बोलणीं करावियाचीं असतील तर तीं बोलणीं भारत सरकारनें प्रत्यक्ष करावींत. त्यापूर्वी त्यांनीं आपली शस्त्रास्त्रें सरकारच्या स्वाधीन केलीं पाहिजेत व स्वतंत्र राष्ट्र आम्हांला नको अशी मान्यता दिली पाहिजे. या गोष्टी होणार असतील तरच सलोखा व प्रेम वाढेल व भारत एकसंधि राष्ट्र होईल. भावी तडजोडींत त्यांची संस्कृति त्यांच्या चालीरीती, त्यांची समाजव्यवस्था आहे तशीच राहील अशी हमी देता येईल. पण स्वतंत्र राष्ट्राची मागणी भारत कधींहि मान्य करणार नाहीं ही सरकारची घोषणा बदलणार नाहीं हें त्यांच्या प्रत्ययास आणून दिलें पाहिजे.

## उपसंहार :

भारतानें स्वातंत्र्यानंतर आपल्या सीमाप्रदेशांची उपेक्षा केली आहे. पारतंत्र्याच्या काळांत सुद्धां जेव्हां कॅांग्रेस सविनय कायदेभंग, सत्याग्रह, असहकारिता वगैरे अहिंसक लढे करीत होती, त्या वेळीं त्या लढ्याची व्याप्ति ही त्या उपेक्षित प्रदेशापर्यंत गेली नव्हती. कॅांग्रेसचें त्या वेळचें धोरणहि संकुचित होतें. संस्थानांत कॅांग्रेस कमिट्याऐवजीं संस्थानी प्रजापरिषदा होत्या. पण जो वगळलेला मुलूख म्हणून घटनेंत निर्दिष्ट केला होता, त्या प्रदेशाला सुद्धां कॅांग्रेसनें लढ्यांतून वगळलें होतें. त्यामुळें स्वातंत्र्याकरितां वेदना, कष्ट, त्याग वगैरेंचा संपर्कहि त्या प्रदेशापर्यंत पोहोंचला नाहीं. आणि आज काय परिस्थिति आहे ? लडाख, नेफा, नागालॅंड, खाशी, जैनटिया, गारो, उत्तर काचार, मिकिर हिल्स, तिरप, बालिपारा, अभोर, मिसिमि, अंदमान, निकोबार, लखदिव, मिनिकॉय, अमिनदिवी, मणिपूर, त्रिपुरा, वगैरे सीमाप्रांतांत व समुद्रांत असलेले हे प्रदेश भारतांत नाममात्र आहेत. याचा अर्थ तेथें भारतीय शासक प्रशासक नाहींत असें नाहीं. पण उद्यां कोणाची दृष्टि त्या विभागाकडे वळली तर त्यांचें संरक्षण करणें कठीण जाईल. तेथील जनतेंतहि आपण भारतीय आहोंत ही जाणीव नांवापुरतीच आहे. भारतीय एकात्मता, राष्ट्रीय भावना ह्या त्यांच्यांत आहेत असें वाटत नाहीं. नागालॅंड, लडाख व नेफानें हा धडा भारताला

शिकवला आहे. प्रश्न एकट्या नागाभूमीचा नाहीं, तो साऱ्याच उपेक्षित विभागाचा आहे. भारत सरकार त्यांतील कांहीं विभागांकरितां घटना करण्याच्या उद्योगांत आहे हें ठीक आहे. पण घटना करून हें काम होणार नाहीं. शासनानेंहि भागणार नाहीं. त्यांच्यांत राष्ट्रीयत्वाची भावना केव्हां निर्माण होईल हा प्रश्न आहे. प्रश्न सोपा नाहीं, कारण त्या त्या विभागांतील लोक आपल्याच पूर्वकालीन युगांत झोपलेले आहेत.

तिबेटचा व भारताचा तसा प्रत्यक्ष संबंध नव्हता. पण तिबेटमध्यें कांहीं हक्क हिंदुस्थानला होते. ते सारे हक्क चीनला राजी ठेवण्याकरितां आपण सोडून दिले. तिबेट हा आपल्या सीमाविभागांतील प्रदेशाप्रमाणें आमचाच असलेला होता. चीननें त्या तिबेटचा घास आपल्या डोळ्यांदेखत घेतला व भारतानें त्याला मान तुकवली. तिबेटप्रमाणेंच तहानें किंवा करारानें भारताशीं निबद्ध झालेले नेपाळ, भूतान व सिक्किम आहेत. भारत सरकार त्याबद्दल जागरूक आहे. पण तें कांहीं असलें तरी भारताचा सीमाविभाग हा असुरक्षितच आहे. तो विभाग जर बलशाली केला नाहीं, तर भारतावर पश्चात्तापाची पाळी येणार आहे.

त्या विभागांत कॉंग्रेस गेली नाहीं; पण इतर पक्ष तरी गेले का? त्यांच्याहि चळवळीची कक्षा ही कॉंग्रेससारखीच मर्यादित आहे. इकडे भारत समतेच्या, समाजवादाच्या भराऱ्या मारीत आहे आणि तिकडे माणुसकीनें जगण्याचें जीवनहि त्यांना उपलब्ध नाहीं. व्यक्तीव्यक्तीमधील आर्थिक समतेपूर्वी आपण जर प्रांताप्रांतांत ती समता आणू शकलों, तर पुष्कळच प्रगति केली असें होईल. दारिद्र्यांत व अज्ञानांत गुरफटलेल्या आणि माणुसकीच्या थरापर्यंत न पोहोंचलेल्या या बांधवांकरितां आम्ही काय करणार आहोंत? मागासलेल्या जातीकरितां एक कमिशन नेमून भागण्याइतका हा प्रश्न सोपा नाहीं, एवढीच जाणीव करून देणें यापलीकडे त्रयस्थ निरीक्षक दुसरें काय करणार?

नागा लोकांना आम्ही सांगत आलों कीं, त्यांच्या पूर्वपरंपरा, चालीरीती, समजुती वगैरेंत भारत सरकार हस्तक्षेप करणार नाहीं. पण हें सांगणें खरें नाहीं. कांहीं काळ त्यांची ही पूर्वस्थिति राहूं शकेल. पण नव्या शास्त्रीय सुधारणांचा मनु तेथें सुरू झाला, म्हणजे जुन्यापैकीं तेथें काय टिकणार? ब्रिटिश राजवटींत हिंदुस्थानचें काय टिकलें? आपल्या जीवनांत जसा आमूलाग्र बदल झाला, तसा ह्या सर्व जमातींच्या जीवनांत होणार आहे. त्याची त्यांना कल्पना

नाहीं हें समजणें चूक आहे. ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं केलेल्या सुधारणा त्यांच्यांत जशा रूढ होत आहेत, तशा आधुनिक जागतिक सुधारणा ह्याहि त्यांच्यांत रूढ होतील. मुंडकीं कापणें आणि जुन्या नांगरानें शेती करणें हें कसें चालू रहाणार ? तेथें रस्ते होतील, आगगाड्या न्याऱ्या लागतील, मोटारी सुळसुळाट करतील, सिनेमा जातील, सायकली, वीज, गिरण्या, कारखाने वगैरे सर्व तेथें सुरू होईल. त्यामुळें त्यांचें जीवन आधुनिक होईल. तें सुखी होईल का नाहीं हें सांगवत नाहीं. तेव्हां ह्या जमातींना दारिद्र्यांतून वर काढावयाचें असलें तर हें सर्व झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

पण हा मागासलेपणा फक्त सीमाप्रांतांतील जमातींत आहे असें नाहीं. ओरिसा, बिहार, आसाम, बंगाल, गुजरात वगैरे सर्वत्र ठिकाणीं कमीअधिक प्रमाणांत आहे. आदिवासींचा हा प्रश्न आहे. तो प्रश्न राज्यघटना करून सुटणार नाहीं. स्वातंत्र्यानंतर विधायक कार्याची जरुरी जर कोठें असेल तर ती ह्या विभागांत. तें कार्य माणुसकीच्या दृष्टींतून करावयास पाहिजे व त्या-करितां सार्वजनिक कार्यकर्त्यांची जरुरी आहे. सरकारी अधिकाऱ्याकडून ही अपेक्षा करणें चूक ठरेल.

चीन–पाकिस्ताननें भारताच्या सीमेवर आक्रमणें करून एका दृष्टीनें भारताचे डोळे उघडले आहेत. आम्ही जर आमच्या दरवाजांचें रक्षण करूं शकलों नाहीं तर घराचें रक्षण कसें करणार ? भारतावर पूर्वी वायव्येकडून आक्रमणें झाली व भारत परतंत्र झाला. आज नैर्ऋत्येकडून ही आक्रमणाची लाट आली आहे. त्या लाटेला आपण मागें सारलें पाहिजे.

नागाभूमीचा प्रश्न हा फक्त ६ हजार चौरस मैलांचा व ३॥ लाख लोकांचा प्रश्न नाहीं. तो अफाट विभागाचा व कोट्यवधि लोकांचा प्रश्न आहे. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न त्यांत समाविष्ट झाला आहे. त्या दृष्टीनें भारतानें आपली सरहद्द सांभाळली पाहिजे. क्रौर्य करू नये; पण शौर्य दाखवावें. निष्ठुर होऊं नये; पण पड खाऊं नये. दुसऱ्यांच्या भावनांना जपावें पण त्यांत स्वतःचा बळी जाईल असें कांहीं होऊं देऊं नये. नागा हे भारताचे घटक आहेत, भारतीय आहेत व भारतीयांप्रमाणें त्यांनीं वागलें पाहिजे यांत कोठेंच तडजोड होणार नाहीं व होऊं नये. नागांच्या उत्कर्षांत भारताचा उत्कर्ष आहे, त्यांच्या प्रगतींत भारताची प्रगति आहे व दोघांच्या ऐक्यांत राष्ट्राची

सुदृढता व राष्ट्राचें भवितव्य निगडित झालें आहे. पण हें सर्व म्हटल्यानंतर नागांचा प्रश्न हा शक्य तितक्या लवकर सोडवला पाहिजे व भारतावरील संभाव्य संकटाची ती खिंड अभेद्य केली पाहिजे यांत वाद नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथ ... प्रत
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ७५२३३ दि.
क्रमांक ... नोंद दि.

REFBK-0015822

# निवडणुकांचे वारे वाहूं लागले

# फक्त १० महिने उरले

## भारतीय लोकशाहीचे सुबुद्ध मतदार होण्यास

## पुढील प्रकाशनें अवश्य वाचा

१ भारतीय राज्यघटना
२ भारत–चीन संघर्ष
३ तिबेटचा बळी
४ लाल किल्ल्याच्या छायेंत
५ सत्तरींतील काका
६ पार्लमेंटांतील बारा वर्षे ( इंग्रजी )
७ राजकीय आठवणी
८ काश्मीरचा रणसंग्राम ( छापत आहे )
९ कच्छचा रणसंग्राम
१० जवाहरलाल नेहरू ( चित्रावली )
११ लालबहादुर शास्त्री–चरित्र
१२ जवाहरलाल नेहरू–चरित्र
१३ म. गांधी–चरित्र
१४ सरदार वल्लभभाई–चरित्र
१५ नागभूमि

## चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणें २